❋ प्रकरण ४ थे ❋

आधुनिक कवितेतील 'दुर्बोधतेचा' मराठी कवितेत झालेला प्रवेश आणि त्याची कारणे

❋ प्रकरण ४ थे ❋

आधुनिक कवितेतील 'दुर्बोधतेचा' मराठी कवितेत झालेला प्रवेश आणि त्याची कारणे

प्रबंधिकेच्या या प्रकरणात आपण मराठी कवितेतील दुर्बोधतेचा विचार करणार आहोत. यादृष्टीने, दुर्बोधता म्हणजे काय? तिचा मराठी कवितेत प्रवेश कधी झाला? तिची कारणे कोणती? या प्रश्नांचा मागोवा घेऊन आपण दुर्बोधतेचे स्वरूप अभ्यासणार आहोत. 'दुर्बोधता' ही संकल्पना आपण विविध मतमतांतरांचा परामर्श घेऊन समजावून घेणार आहोत. त्या पार्श्वभूमीवर ग्रेस यांच्या कवितेतील दुर्बोधतेचे स्वरूप आणि कारणेही आपणास अभ्यासावयाची आहेत.

आधुनिक मराठी कवितेतील दुर्बोधता आणि तिचा मराठी कवितेत झालेला प्रवेश याचा विचार करण्यापूर्वी 'दुर्बोधता' म्हणजे काय? याबद्दल थोडासा उहापोह करणे क्रमप्राप्त व योग्यच ठरेल.

काव्यात्म किंवा काव्यातील दुर्बोधतेबद्दल आजपर्यंत अनेक साहित्यिक, समीक्षक व वाङ्मय अभ्यासकांनी आपापली मते मांडली आहेत. दुर्बोधतेबद्दल विचार करताना पुढील दोन मुद्दे समोर येतात.

१) दुर्बोधता म्हणजे काय?

२) मराठी कवितेतील दुर्बोधतेचा प्रवेश व त्याची कारणे.

दुर्बोधता म्हणजे काय?

दुर् + बोध = दुर्बोध

दुर् म्हणजे कठीण, अवघड. बोध होणे म्हणजे समजणे, आकलन होणे. जेथे अर्थाचे आकलन होणे कठीण जाते ते दुर्बोध. दुर्बोध म्हणजे आकलनास अवघड किंवा समजण्यास कठीण.

कवितेतील दुर्बोधतेचा प्रश्न हा प्रामुख्याने शब्दांच्या अर्थाशी संबध्द आहे. कवितेच्या अर्थाचे आकलन करून घेऊ न कवितेतील अभिव्यक्त अनुभूतींचा आस्वाद घ्यायचा असतो. ही आस्वादनाची प्रक्रिया सहजसुलभ होणे आणि त्यातून पुनःप्रत्ययाचा

आनंद मिळणे आणि काव्यार्थाशी तादात्म्य पावणे या सर्व बाबी कवितेतील अर्थ आणि प्रतिपाद्य विषय समजण्यावर अवलंबून असतात. कवितेतील शब्दांच्या अर्थाच्या वाटेनेच रसिक कवितेच्या अनुभूतींच्या, संवेदनाच्या प्रदेशात पोहचत असतो. या वाचकाच्या वा रसिकाच्या कविता आस्वादण्याचा किंवा कविता उपभोगण्याचा किंवा कवितेच्या अर्थाचे आकलन करून घेण्याचा जो प्रयत्न आहे त्याच्याशी संबंधित दुर्बोधतेचा प्रश्न निर्माण होतो.

कवी कविता लिहितो आणि रसिक किंवा वाचक ती कविता वाचतो. या दोघांना सांधणारा पूल म्हणजे कविता असते. कवीला वाटते रसिकांनी दाद दयावी आणि रसिकाला वाटते कवितेत दाद देण्यासारखे काहीतरी असावे. पण या दोन्ही क्रियांमध्ये 'शब्द' हे जे कवितेचे माध्यम तेच माध्यम महत्वाचे आणि साधारण (Common) घटक आहे. या शब्दांचे अर्थ, अर्थच्छटा यांचा बोध झाला तर दुर्बोधतेचा प्रश्नच निर्माण होणार नाही. शब्द किंवा भाषा यांचा तार्किक, ज्ञानात्मक किंवा वस्तुदर्शक अर्थच केवल ग्राहय धरून न रहाता भाषेचे व्यापक आणि सर्वसंग्राहक व व्यक्तिसापेक्ष स्वरूप ही विचारात घ्यावे लागते. दुर्बोधतेची कारणे या सगळयातील ताण-तणावामुळे निर्माण होतात. कवीला, ज्या जाणिवा, अनुभूती येत असतात त्याच पातळीवर त्या त्याच्या कवितातून रसिकांना आल्या तर दुर्बोधता रहात नाही पण जेव्हा कवीच्या जाणिवा-नेणिवा आणि वाचकांच्या जाणिवा-नेणिवा यात कमालीचे अंतर पडते तेव्हा वाचकाला कविता दुर्बोध वाटणे साहजिक आहे. याबाबत आणखी असाही विचार करता येईल की कवितातून अथवा तिच्या शब्दार्थातून रसिकांना कोणत्या ना कोणत्या तरी अनुभूतींची, संवेदनांची संगती लावता आली तरीही (मग ती अनुभूती कवीच्या अनुभूतीच्या समपातळीवर नसली तरीही) कविता दुर्बोध वाटणार नाही. पण कोणताच आशय अथवा अनुभूतींची, संवेदनांची संगती लागली नाही तर रसिक अथवा वाचक चाचपडत रहाणार आणि कविता दुर्बोध होणार याला कारण कवी व वाचक दोन्ही नसून शब्दांचे अथवा भाषेचे व्यापकत्व, बहुपैलुत्व आणि सर्वसंग्राहक स्वरूपच कारणीभूत होईल. म्हणूनच एखादा शब्द एखादी प्रतिमा कविने कवितेत ज्या अनुभवाच्या अभिव्यक्तीसाठी वापरली आहे. तोच शब्द त्याच अर्थाने, तीच प्रतिमा त्याच अनुभूतीसाठी वाचक वापरेलच असे नाही, अशावेळी कवीचा एकजिनसी, एकसंघ अनुभव हा वाचकाला जाणवणार नाही, आणि अनुभवात अंतभूर्त असणाऱ्या सलगपणात खंड पडून वाचकाला कवितेचा बोध होणार नाही व तो कवितेला 'दुर्बोध' म्हणेल. याबाबत गो.वि.करंदीकर म्हणतात, ''भाषा ही मूलतःच स्थितीचा आभास निर्माण करणारी एक गतीरूप संकेतपध्दती

आहे. एखादया शब्दाचा विशिष्ट कवितेतील अर्थ हा - (१) त्या शब्दाचे पूर्वीचे अर्थ (२) कवीच्या विशिष्ट हेतूमुळे प्राप्त झालेला अर्थ (३)कवितेच्या घाटाने संस्कारित झालेला अर्थ (४)शब्दांच्या कल्पित ध्वनीरूपाने जाणवणारा अर्थ (५) कागदावरील दृश्यरूपाने जाणवणारा अर्थ (६) विशिष्ट सांस्कृतिक परिस्थितीतून निष्पन्न होणारा अर्थ (७)रसिकांच्या विशिष्ट हेतूमुळे उद्‌भवणारा अर्थ आणि त्या शब्दाचे भविष्यकाळातील संभाव्य अर्थ - इतक्या वेगवेगळया ताणांनी प्रभावित होऊ शकतो. प्रत्येक ठिकाणी हे घडतेच असे नाही पण यातील जे ताण कवीला अभिप्रेत असतील तेच ताण त्याच प्रमाणात रसिकाला आत्मसात करता येतील असे समजण्याला आधार नाही. भाषेचा अंतिम अर्थ निश्चित करणे कोणालाच शक्य नसते. शब्द जोपर्यंत कार्यप्रवण होऊ शकतो तोपर्यंत तो गतीशील व अनिश्चयार्थकच असतो.''[१]

याबद्दल अनेक मतांतरे आहेत. दुर्बोधता म्हणजे गूढगुंजन, अद्‌भुत, सहेतुक अस्फुटता असे अनेकवेळा सांगितले जाते. पण गूढगुंजनपर कवितांचे विषय हे ब्रम्ह, माया, ईशसामित्यप्रतीती इ.असतात. अद्‌भूत म्हणजे लोकविलक्षण, अकल्पनीय आणि थोडेफार दैवी, असुरी, जादुमयी असे अनुभव म्हणता येतील. सहेतुक अस्फुटता म्हणजे अस्पष्ट असे अनुभव पण या तिन्हीमुळेही 'दुर्बोधता' या शब्दाची व्याख्या होत नाही. म्हणूनच श्री.के.क्षीरसागर म्हणतात,'' 'दुर्बोधता' ही गूढगुंजनाची अपरिहार्य सहचरी होय ही या क्षेत्रातील दुसरी कुकल्पना होय. दुर्बोधता आणि सहेतुक अस्फुटता ही गूढ काव्याची प्रमुख लक्षणे नव्हेत; दुर्बोधता हा तर उघड दोषच होय. अनुभव मुळात गूढ आणि अपूर्व असल्यावर तो पुन्हा दुर्बोध करण्याचे वा दुर्बोध होण्याचे कारण नाही.''[२]

दि.पु.चित्रे काव्यात्म दुर्बोधतेचा संबंध काव्यवाचनाशी जोडतात. त्यांच्यामते काव्यात्म दुर्बोधता काव्यवाचनाचा उद्देश, कवितेचे अंतिम कार्य आणि बोधाचे स्वरूप या बाबींशी सलग्न असते. याबाबत दि.पु.चित्रे म्हणतात, ''आपण ज्या कारणासाठी कविता वचातो त्या कारणातच कवितेचे स्वरूप, कार्य आणि तिच्यापासून अपेक्षित असलेले मूल्य गर्भित असते. कवितेचा जो काही बोध होतो तेच कविचे अंतिम कार्य असते काय?''[३] म्हणजेच काव्यवाचनाचा उद्देश प्रत्येक वाचकाबरोबर बदलणारा आणि म्हणूनच उद्देशाबरोबरच बोधही वाचकपरत्वे बदलणारा असतो.

दि.पु.चित्रे यांची ही भूमिका मान्य करताना अडचण अशी येते की, 'काव्यात्म दुर्बोधता' ही अस्तित्वातच रहात नाही. म्हणजे असे की जर वाचकाच्या काव्यवाचनाच्या उद्देश्यपरत्वे, वाचकपरत्वे बोधही बदलत असेल तर मग एकाच कवितेचे अनेक बोधार्थ निघू शकतील, पण ती 'दुर्बोध' रहाणार नाही. कारण वाचकपरत्वे, काव्यवाचनाच्या उद्देश्यानुसार कवितेचा बोध होत गेला तर त्या कवितेत 'दुर्बोधता' राहिलच कशी? आणि मग कोणतीच कविता कोणालाच 'दुर्बोध' वाटणार नाही.

काव्यात्म दुर्बोधतेबद्दल नरहर कुरूंदकर आपली मते अत्यंत जबाबदारपणे मांडताना दिसतात. काव्यात्म दुर्बोधतेबद्दल ते म्हणतात,''अगदी लहानपणापासून 'न समजणे' उर्फ 'दुर्बोधता' या बाबींशी माझा परिचय झालेला आहे, आणि असाच बहुतेकांचा होतो, अशी माझी समजूत आहे. ही काव्यातील प्रथमतः जाणवणारी दुर्बोधता म्हणजे शब्दांचा अर्थ न कळल्यामुळे जाणवणारी दुर्बोधता आहे. मराठीत विठ्ठल बिडकरांनी आणि मोरोपंतांनी असल्या प्रकारच्या दुर्बोधतेशी माझा पहिला परिचय करून दिला. हळूहळू ही अवस्था संपून जाते. मग दुसऱ्या प्रकारची दुर्बोधता जाणवू लागते. तिचे स्वरूप एखादी कल्पना न कळल्याचे असते. कवी जे मांडू इच्छितो अगर सांगू इच्छितो त्यातील एखादी कलपना कधी कधी चटकन समजतच नाही. पण यां दोन्ही दुर्बोधतांच्यापेक्षा खरी दुर्बोधता निराळयाच प्रकारची असते आणि तिचे स्वरूप कवीच्या अभिव्यक्त होणाऱ्या अनुभवाशी तादात्म्य पावता न येणे असे असते.''[४]

कुरूंदकरांच्या मते एकदा कवीची अनुभव घेण्याची व मांडण्याची रीत थोडयाशा परिचयाने रसिकांच्या अंगवळणी पडली म्हणजे मग क्रमाने त्या कवितेतील दुर्बोधता कमी होत जाते. पण यापुढे जाऊन नरहर कुरूंदकर म्हणतात, ''पण जिच्यातील अनुभवाची एकात्मता कुणालाही जाणवणे शक्यच नाही अशी 'दुर्बोध' कविता ही कविता म्हणून मान्य करणे कठीण आहे. योग्य रसिकालाही कळत नाही आणि कविलाही कळत नाही. तिच्यात अनुभवाची सलगता अगर एकात्मता तत्वतःच असू शकत नाही अशी एक कवितेची श्रेष्ठ जात मान्य करण्याची आपत्ती ज्या विवेचनाने कोसळते त्या विवेचनाशी सहमत होणे मला कठीण आहे.''[५]

नरहर कुरूंदकरांना 'दुर्बोधता' म्हणूनच मान्य नाही. कारण ज्या कवितेत अनुभवांची एकात्मता कुणालाच जाणवणे शक्य नाही अशी कविता श्रेष्ठ कविता असू शकत

नाही. म्हणजेच कवीने कवितेतून मांडलेले अनुभव स्वयंपूर्ण असतात व त्यांचा उलघडा व आकलन कवितेतून झाले पाहिजे त्यासाठी कवी आणि रसिक यांच्यात नव्या मध्यस्थांची (उदा.समीक्षकाची) गरज नाही म्हणूनच कुरूंदकरांच्या मते जी कविता समजत नसेल ती कविता ही कविलाच नसेल, असे म्हणण्याचा अधिकार रसिकांना आहे. आणि त्या कवितेचे तुम्ही रसिक नव्हेत असे म्हणण्यास कवी मोकळे आहेत पण एकूणच कुरूंदकरांना अनाकलनीय अनुभव अमान्य आहेत.

रा.श्री.जोग दुर्बोधतेबाबत करंदीकरांशी काही अंशी सहमत होतात पण काव्यात दुर्बोधता का येते या विषयी आणि शब्दार्थचर्चा याविषयी अधिक स्पष्टीकरण देऊन दुर्बोधतेची कारणमिमांसा देतात. एखादया कवितेतील शब्दाचा अर्थ अनेक ताणांनी प्रभावित झालेला असतो आणि शब्दांचा केवळ शब्दकोशातील वाच्यार्थ तेथे समर्पक असत नाही हाच मुद्दा रा.श्री.जोग यांनी जुन्या साहित्यशास्त्रांच्या आधारे अधिक विशद केला आहे. करंदीकरांनी शब्दार्थावर येणारे जे नऊ प्रकारचे ताण सांगितले आहेत त्यात रा.श्री.जोगांनी आणखी ताणांचा समावेश केला आहे. ते म्हणतात,''शब्द अनेकार्थ असला, तर त्याचा विशिष्ट स्थलीचा प्रस्तुतार्थ निश्चित होण्याच्या दृष्टीने संयोग-विप्रयोग, साहचर्य-विरोधिता, प्रकरण (संदर्भ), अर्थ (प्रयोजन), लिंग, अन्यशब्दसानिध्य, सामर्थ्य, औचित्य, देश, काल, व्यक्ती, स्वर इ.चा उपयोग होतो. तसेच कोणत्याही शब्दाच्या अर्थापासून आणखी अर्थ सूचित होण्यास, म्हणजे त्या अर्थात आणखी व्यंजकता येण्यास, बोलणारा (वक्ता), तो ज्याला उद्देशून बोलत आहे तो (बोद्धव्य) याशिवाय आणखीही उपस्थित असणारा (अन्यसांनिध्य) प्रस्ताव (संदर्भ), देश, काल, उच्चारवैशिष्टय इ.कारणांनी अर्थामध्ये विशेषार्थसूचकता येते. संदिग्धता येते ती,अथवा दुर्बोधता येते ती, या इतक्या ताणांनाही झुकांडी देऊन शब्द वापरला जातो तेव्हा आणि त्यामुळे भाषेचे आणि वाङ्मयाचे उद्दिष्ट आपला आशय इतरांपर्यंत पोहोचावे हे असेल तर शब्द हे अशा ताणांनी नियंत्रित झाले पाहिजेत. शब्दाचे वाचकत्व नियंत्रित करण्याचे हे मार्ग आहेत परंतु शब्द आणि भाषा गीतशील असते या सबबीवर या ताणांकडे दुर्लक्ष करून जेव्हा लिहिले जाते तेव्हा दुर्बोधता येते. अपरिहार्य होते. ताण कितीही वेगवेगळे असले तरी सुजाणवाचक ते समजून घेऊ शकतो; पण ते पुरवण्याबाबत बेफिकिरी असली की शब्द दुर्बोध राहणे अपरिहार्य आहे. तो दोष काही शब्दांचा नाही; त्या शब्दांची योजना बेफिकिरपणे करणाऱ्या योजकाचा आहे.''[६]

''आपला आशय इतरांपर्यंत पोहोचावा' हे जर वाङ्मयाचे किंवा कवितेचे उद्दिष्ट असेल तर वाङ्मय अथवा कविता 'दुर्बोध' असू नये असे रा.श्री.जोग यांना वाटते, म्हणजे दुर्बोधता असावी की नसावी? हा प्रश्न वाङ्मयाच्या वा कवितेच्या उद्दिष्टांशी निगडीत होऊ शकतो. कविता केवळ 'स्वार्थ'च असेल तर कवीचे काहीच बिघडत नाही पण 'परार्थ' ही असेल तर कवितेत दुर्बोधता असू नये असेच रा.श्री.जोगांना वाटते. दुर्बोधता म्हणजे शब्दार्थाचे सूचकत्व न होणे हे सांगतानाच दुर्बोधता असू नये असेही ते सांगतात. म्हणजे रा.श्री.जोगांनाही कवितेतील दुर्बोधता अमान्य आहे.

'कविता ही भोगायची असते' या करंदीकरांच्या मुदयावरही दुर्बोधतेच्या निमित्ताने रा.श्री.जोग भाष्य करतात. दुर्बोध असलेली कविता कशी भोगता येईल? आणि तशी असमंजसपणे भोगली तर त्यातून आनंद किती मिळेल? असाही उचित प्रश्न रा.श्री.जोगांनी उपस्थित केला आहे.

विजया राजाध्यक्ष 'दुर्बोधतेविषयी' विचार मांडताना म्हणतात, ''काहीवेळा कवीजवळ आशय समर्थपणे व्यक्त करण्याइतकी विपुल, अनुरूप शब्दसामुग्री नसते. या त्रुटींमुळे कवितेचा अविष्कार क्लिष्ट किंवा शिथिल होतो आणि वाचकाला त्या आशयाशी संवाद साधणे कठीण वाटते. ही परिस्थिती दुर्बोधतेला जन्म देते. या प्रकारच्या दुर्बोधतेला कवितेतील अपरिहार्य दुर्बोधता म्हणता येणार नाही. काही वेळा वाचकाचीच भाषेची सामुग्री व (जाणसुध्दा) अपुरी असते. येथे भाषेची सामुग्री म्हणजे केवळ तिच्यातील शब्द नव्हेत हे स्पष्ट केले पाहिजे. या सामुग्रीत भाषेसंबंधीची जाण अंतर्भूत असावी लागते. ती शब्दातील विविध अर्थच्छटा समजून घेण्याच्या व त्या अर्थच्छटांपैकी नेमकी अर्थच्छटा निवडून कवितेचा आशय समजून घेण्याच्या क्षमतेतून प्रकट होते. वाचकाच्या ठिकाणी त्या क्षमतेचा अभाव असेल तर तो कवीचा दोष नव्हे अशावेळी वाचकाने स्वतःची मर्यादा ओळखून कवितेवर दुर्बोधतेचा आरोप न करणे हेच योग्य.''[७]

विजया राजाध्यक्ष यांनी दुर्बोधतेचा संबंध भाषेतील शब्दसामुग्रीशी जोडला आहे. कवीच्या मनातील आशय नेमकेपणाने, समर्थपणे व्यक्त करण्यासाठी भाषेची सामग्री अपुरी पडते असे त्यांचे मत आहे. याशिवाय काहीवेळेला कवीची तर काहीवेळेला वाचकांची भाषेची शब्दसामुग्री व जाण ही अपुरी पडली तरीही कविता दुर्बोध होते, असेही त्यांचे मत आहे. परंतु शब्दातील विविध अर्थच्छटा समजून घेऊ न त्यातील नेमकी

अर्थच्छटा निवडून कवीचा कवितेतून मांडलेला आशय समजून घ्यावा या मताशी सहमत होणे कठीण आहे. कारण शब्दांचे अनेकार्थी स्वरूप लक्षात घेऊनही वाचकांनी जी अर्थच्छटा निवडली आहे तीच अर्थच्छटा कवीला अभिप्रेत असेलच असे नेमकेपणाने म्हणता येईल असे वाटत नाही. कवीच्या तोडीची शब्दसंवेदना असलेल्या वाचक समीक्षकांच्या बाबतीतही हीच अडचण येण्याची शक्यता आहे.

दुर्बोधतेचे कारण कवीने स्वतःच्या आविष्कारसिध्दिसाठी निर्माण केलेले भाषेचे नवे रूप हेही असते असेही विजया राजाध्यक्ष यांचे मत आहे. तसेच कविला अभिप्रेत असलेला आशय अनावश्यक शब्दातून, शिथिल रचनेतून विखरून जाऊ नये म्हणूनही कवी कमीतकमी शब्दात आपली अनुभूती काव्यबध्द करतो. हेही कवीची कविता दुर्बोध होण्याचे कारण असते.

विजया राजाध्यक्षांनीही सुधीर रसाळांच्याप्रमाणेच दुर्बोधता दोन प्रकारची असते असे मत मांडले आहे. (१) खरी दुर्बोधता (२) कृतक दुर्बोधत. कृतक दुर्बोधता कोणालाही मान्य होणारी नाही पण खऱ्या दुर्बोधतेची मीमांसा आणि खरी दुर्बोधता व कृतक दुर्बोधता यातील फरक सांगण्याचे कार्य मात्र समीक्षकांचेच आहे असे त्यांचे मत आहे.

सुधीर रसाळांच्या मते काव्यात्म दुर्बोधतेची चर्चा करताना 'कविता' आणि 'वाचक' या दोन दृष्टीनेच विचार करावा लागेल. कारण त्यांच्या मते,"कविता आणि वाचक ही दोन पदे गृहित धरल्यानंतर वाचकाच्या अपेक्षांचे स्वरूप तपासणे क्रमप्राप्त ठरते. वाचकाच्या काव्यविषयक अपेक्षा व्यक्तिपरत्वे बदलत नाहीत. कारण वाचकांच्या अपेक्षा पूर्णतः स्वायत्त असत नाहीत. त्यांच्या भाषेतील कविता व इतर वाङ्मय आणि कला तसेच त्यांची संस्कृती यातून त्यांच्या काव्यविषयक अपेक्षा घडत असतात. हया अपेक्षा लवचिक, गतिमान परिवर्तनशील असतात. परंपरेपेक्षा वेगळी कविता त्याच्यासमोर आली की त्याच्या अपेक्षा व प्रत्यक्ष कविता यात द्वंद्व निर्माण होते अशावेळी जर त्याच्या अपेक्षा ठोकळेबाज, स्थिर बनल्या असतील तर त्याला कवितेचे आकलन होणार नाही व आकलन होऊ नही तिची कलात्मता मान्य होणार नाही. परंतु लवचिक परिवर्तनशील अपेक्षा बाळगणाऱ्या वाचकात ही परंपरेपेक्षा वेगळी असलेली कविता परिवर्तन घडवून आणू लागते. हळूहळू अशा कवितेकडे जाण्याचे त्याचे मार्ग बदलतात व अशा कवितेचे अर्थात्मक (semantic) आणि कलात्मक आकलन त्याला होऊ लागते. अनेकदा या प्रक्रियेतून वाचक जाऊनही

काही कविता त्याला दुर्बोध वाटतात. ही कविता वाचल्यावर त्याला मनात अपुरी असमाधानकारक वाटणारी अर्थसंघटना उभी रहाते. हया अर्थसंघटनेचे काही पदर, काही भाग अज्ञातच आहे अशी जाणीव त्याला होते. अशावेळी ती कविता अनेक पदरी असते. अनेक प्रकारच्या नात्यातून अनेक प्रकारच्या संघटना तिच्यात निर्माण झालेल्या असतात. हया सर्व संघटना, हे सर्व पदर, ही सर्व नाती सेंद्रिय स्वरूपाची असतात. येथे या पदराचे वेगळेपण जाणवूनही त्याचे वेगळे रूप स्वायत्त, स्वयंभू असत नाही. अशी अनेकपदरी संघटना देणारी आपल्या सेंद्रियत्वाची प्रचीती देणारी कविता पूर्णाकलनीय असत नाही. ती दुर्बोध असते, ती या अर्थाने.''[८]

सुधीर रसाळ यांनी काव्यातील दुर्बोधतेचा संबंध शब्दार्थाशी आणि अर्थसंघटनेच्या रूपाचे आकलन करून घेण्याच्या वाचकाच्या प्रयत्नांशी निगडीत असल्याचे म्हटले आहे.

सुधीर रसाळांच्या या भूमिकेशी सहमत होणे काही अंशी अडचणीचे ठरू शकते कारण कवीने शब्दातून निर्माण केलेली अर्थसंघटना व वाचकांना आकलन झालेली अर्थसंघटना एकच असू शकेल याची खात्री देता येत नाहीच. कारण शब्दशक्ती ही भावसंबद्ध, अनेकार्थी असल्याने अनेक अर्थांच्या संघटना निर्माण होऊ शकतात. म्हणून कवीची अपेक्षित अर्थसंघटना व वाचकांना आकलन झालेली अर्थसंघटना यात तफावत असण्याची शक्यता आहे.

सुधीर रसाळांनी दुर्बोधतेचा आणखी एक प्रकार आवर्जून सांगितला आहे तो म्हणजे, 'व्याज-दुर्बोधता' ज्या कवितांतून अर्थसंघटनाच नसते अशा कवितातून 'व्याज-दुर्बोधता' असते. त्या कवितेच्या शब्दाशब्दातून अर्थाचे नातेच निर्माण झालेले नसते. आणि जेव्हा रसिक या शब्दनात्यांचा शोध घेऊ लागतो तेव्हा ते शब्दार्थ परस्परछेदक असल्याचे त्याच्या लक्षात येते. आणि त्यामुळे वाचक अधिक अर्थहीन होत जातो. ज्या कवींना 'दुर्बोधता' हे भूषण वाटते त्या कवींनी जाणीवपूर्वक दुर्बोधता कवितेत आणण्याचा असाही प्रयत्न केल्याचे दिसून येते. परंतु अशा कवितांमुळे दुर्बोध वाटणाऱ्या पण कलात्मक कवीवर अन्याय होण्याची शक्यता असते.

कवितेमध्ये एखादी अनुभूती अभिव्यक्त होताना त्याच्या विश्लेषणासाठी काही ओळी येतात. काही जाणीवविश्लेषणात्मक शब्द येतात. त्यामुळेही कवितेतील अनुभवांचे आकलन होण्यासाठी मदत होते. उदा.

फुटेल उकळी जमेल फेस,
उडून जाईल जीवन-वाफ;
तरि सांध्यातुन कढईच्या हया
फक्त बसावा थोडा कैफ
तव नामाचा भेसूर धुरकट.

ऐहिक जीवनाचे चिंतन आणि ईश्वरचिंतन यांचा संदर्भ घेऊन या ओळीचा अर्थ लागतो पण मर्ढेकरांच्या काही ओळींचे अर्थाकलन होत नाही उदा.

उंबरठयावर पिवळा हत्ती
भरला चिंध्यानी अलबेला
पिंगटलेला सताड भोंदू
त्यास दाविती दोंद तबेला.

पु.शि.रेग्यांची 'हात थंड' या कवितेबाबतही अर्थाचे आकलन होत नाही.

हात थंड. वेगळेच. आता दूर.
डोळयापासून. डोळेच. मीच.माझे.
चापावरचे बोट तसेच थकून न थकलेले.
ताठ.अटळ.अचूक. तसेच.तिकडेच.
एक.एकाहून एक. एकावर एक.
एकाला एक. अनेकात एक. एकेक.
मी? नव्हतोच. नाहीच. असताना
असाच, पेत हाताला हात हातावर.

पुढून, थोडा पुढे. तिथेच. थेच.

नाहीत चुकत; हरदम. डोळाच नेम.

आत संथ. निघोर. हाकेला हाक, बिनहाक.

अचानक अधिकच. सगळेच हात.... हात.

वरील कवितेत एकूण ३२ पूर्णविराम आणि एक प्रश्नचिन्ह म्हणजे एकूण ३३ वाक्ये कवीला अभिप्रेत असावीत. शेवटचे वाक्य कोणत्याही चिन्हाशिवाय अपूर्ण सोडले आहे. व्याकरणिकदृष्टया विरामचिन्हांनाही अर्थ असतात. इथे तेच अर्थ कवीला अभिप्रेत आहेत असे समजले तरीही अनुभवाची एकात्म संघटना निर्माण होत नाही आणि ती कविता रसिकांना दुर्बोध वाटते. म्हणूनच सुधीर रसाळ म्हणतात, ''आजची कविता ही व्याकरणनिष्ठ स्पष्टीकरणात्मक शब्दानुक्रम कटाक्षाने टाळली गेल्याने दुर्बोध बनते.''[९]

असे दुर्बोधतेचे विवेचन केले तरीही सुधीर रसाळांना 'दुर्बोधता' ही गोष्ट आवश्यक वाटत नाही आणि तशी ती कुणालाच वाटू नये. कारण प्रासादिक कविता जगातील सर्वश्रेष्ठ कविता असू शकते आणि असते, असे अनेक आदर्श दाखले ज्ञानेश्वरादी संतकाव्याने जगाला दिलेले आहेतच.

या पार्श्वभूमीवर गंगाधर गाडगीळ यांचे विचार थोडे वेगळे आहेत. दुर्बोधता हे काव्याचे लक्षण आहे, एवढेच नव्हे तर 'व्यवच्छेदक लक्षण' असे नवकवितेतील दुर्बोधतेचे समर्थक गाडगीळ यांनी सांगितले आहे.

गंगाधर गाडगीळांचे दुर्बोधतेबद्दलचे विचार सौम्य किंबहुना दुर्बोधतेचे समर्थक वाटतात. नवकाव्यातील दुर्बोधता हे नवकवितेचे वैशिष्टयपूर्ण लक्षणच काय भूषणसुध्दा असू शकते असे गंगाधर गाडगीळांना वाटते. नवकवी हे शब्दांच्या छाया पडछायांचा अत्यंत अर्थपूर्ण खेळ कवितेत करतात आणि अर्थपूर्ण शब्दचमत्कृतींचा फार परिणामकारक उपयोग करतात. कवीच्या अनुभवाच्या विश्वात चाललेल्या प्रचंड उलथापालथीमुळे आणि संमिश्र भावनांच्या आंदोलनांच्या कल्लोळामुळे कवीची कविता ही व्यामिश्र भावभावनांचा आविष्कार करते. त्यातील विसंगतीही सुसंगतपणे मांडते म्हणूनच ती दुर्बोध होते. ''नवकवी काहीतरी विशेष अवघड असे करण्याचा प्रयत्न करीत असतो. अमूर्त भावनांचा आकार शोधत असतो. त्यामुळे त्याच्या हातून चुका होण्याची शक्यता अधिक

आणि त्या चुका लक्षात येणेही अवघड. अशा प्रकारच्या चुका विं.दा.करंदीकरांसारखे चांगले कवी करीत असतात आणि त्या चुकांनाच गुण समजण्याचा घोटाळा तथाकथित रसिक टीकाकार करीत असतात, हे मला माहीत आहे. परंतु नवकाव्य ज्या मार्गाने चालले आहे आणि ज्या काव्यविषयक भूमिकेवर आधारलेले आहे तो मार्गच, ती भूमिकाच चूक आहे असे कोणी म्हटले तर मात्र ते मला मान्य होणे शक्य नाही.''[१०]

मर्ढेकरांनी आपल्या काव्यविषयक जाणिवांची क्षितीजे वाढवली आणि नवकवितेचा प्रारंभ केला म्हणूनच नवकवितेची ओळख करून देणारे बा.सी.मर्ढेकर हे मराठीचे 'दुसरे केशवसुत' म्हणून मान्यता पावले. मर्ढेकरांच्या कवितेमुळे मराठी कवितेला जे साचलेपण आणि साचेबंद रूप आले होते ते नष्ट झाले आणि मराठी कविता वाहती झाली. नवसंजीवनी मिळून ती झळाळली, तरारली आणि स्वतंत्र झाली. ''मर्ढेकरांचे ऋण मराठी कवितेने मान्य केले पाहिजेत आणि तसे ते मान्य केलेही आहेत. पण त्याचबरोबर दुर्बोध, निरर्थक आणि ओंगळ गोष्टींचे आजकल जे शब्दाशब्दात पेव फुटलेले दिसते आणि त्याची व्युत्पन्न समर्थने केलेली दिसतात, त्यांचीही जबाबदारी मर्ढेकरांच्यावरच येते. त्यांनी एका सांकेतिकतेविरूध्द बंड केले, पण त्यांचे नाव घेऊन आता दुसरी सांकेतिकता प्रतिष्ठा पावू पहात आहे.''[११]

वरील सर्व मतमतांतरे पाहता आपल्या असे लक्षात येते की, मराठी कवितेतील दुर्बोधता अमान्य असणाऱ्या आणि दुर्बोधतेचे समर्थन करणाऱ्या अशा दोन्ही पक्षांची काही मते निश्चित आहेत. ती थोडक्यात पुढीलप्रमाणे -

दुर्बोधता अमान्य असणाऱ्या पक्षांची मते अशी की -

१) दुर्बोधता हे काव्याचे लक्षण नाही. नसावे. काव्यात दुर्बोधता असणे केंव्हाही वाईटच.

२) दुर्बोधता ही कविता आणि रसिक यांच्यातील मोठीच दरी आहे.

३) प्रासादिक काव्यही नितांत सुंदर असू शकते.

४) कवितेतील भावसंगती आणि अर्थसंगती या दोन्ही परस्परपूरक असाव्यात.

५) कवितेचा आस्वाद घेताना दुर्बोधतेचे अडसर येतात ते येऊ नयेत.

दुर्बोधतेचे समर्थन करणाऱ्या पक्षाची मते अशी की,

१) गहन आणि सूक्ष्म आशयाभिव्यक्तीसाठी दुर्बोधता अटळ आहे.

२) अशा अटळ दुर्बोधतेला दोष देऊ नये उलट ते नवकाव्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे.

३) अशा दुर्बोधतेला काव्याचे दूषण न मानता भूषण मानावे.

४) काव्यातील आशयापेक्षा अभिव्यक्तीला अधिक महत्व आहे. त्यामुळे शब्दांच्या कारागिरीला स्थान अधिक मिळते.

५) अर्थसंगती नसली तरी चालेल पण भावसंगती येणे आवश्यक आहे त्यामुळे दुर्बोधता अटळ आहे.

दुर्बोधतेबद्दल एवढी चर्चा झाल्यानंतर दुर्बोधतेच्या प्रवेशासंबंधी विचार करणे योग्य होईल. मराठी नवकाव्याचे आगमन दुर्बोधतेसह झाले म्हणून नवकाव्यातूनच दुर्बोधतेचा मराठी कवितेत प्रवेश झाला असे म्हटल्यास ते चूक होणार नाही.

मराठी नवकाव्य नव्या जाणिवा, नवी संवेदना आणि नवी भाषा घेऊन अवतरले. या वैशिष्टयाबरोबरच नवकाव्याचे लक्षणीय वैशिष्टय जाणवले ते म्हणजे 'दुर्बोधता' म्हणूनच दि.के.बेडेकर म्हणतात,"कवितेचा, किंबहुना साहित्याचा विचार करताना आज 'अर्थ' हे प्रश्नचिन्ह होऊन बसले आहे."[१२] म्हणजेच आजच्या कवितेतील अर्थ, आशय-संघटना शोधताना वाचकाची अडचण होते. यापूर्वी मराठी कवितेतील अर्थ शोधताना वाचकांना अशी अडचण वाटत नव्हती असे नाही. संतकाव्यातील अध्यात्माच्या, ब्रह्म-माया तत्वाच्या पातळीवरील काव्यरचना सर्वसामान्यांना दुर्बोधच होत्या. उदा.

मुंगी उडाली आकाशी। तिने गिळिले सूर्याशी
अगा नवलाव झाला । वांझे पुत्र प्रसवला
माशी व्याली घार झाली। देखोनि मुक्ताई हासली.

किंवा

काटयाच्या अणीवरी वसले तीन गाव
दोन ओसाड, एक वसेचिना

किंवा

चिंचेच्या पानावर देऊळ बांधिले

अशी संतकाव्यातील, भारूडातील, अध्यात्मविषयातील दुर्बोधता, कधीही चर्चेचा विषय बनली नाही. पंतकाव्यामधील दुर्बोधता ही अध्यात्माबरोबरच अर्थजड, क्लिष्ट शब्दचमत्कृती, दूरान्वय यामुळे आली होती. संत.पंडिती आणि शाहिरी कूटकविता दुर्बोध वाटत होती पण त्यातील अध्यात्मवाद, अज्ञेयवाद आणि कूटवाद यामुळे आलेली दुर्बोधता त्या त्या विषयातील सखोल व सूक्ष्मज्ञानाने, अभ्यासाने दूर होण्यास मदत होते, म्हणूनच त्यातील दुर्बोधता एवढी वादग्रस्त ठरली नव्हती. शाहिरी काव्यातील शाब्दिक कसरती, दूरान्वय, शब्दपांडित्याच्या प्रदर्शनाचा सोस यामुळे काही शाहिरी काव्य क्लिष्ट, कूट होई. शब्दार्थ व संबंधित विषय जाणून घेताच त्यातील दुर्बोधता दूर होई. उदा.

'अलिकुल वह्नाचे वहन आणीत हाते.'

असे असूनही 'दुर्बोध' हा शब्द या वाङ्मयासाठी उपयोजिला जात नाही. इतकेच काय पण केशवसुतांच्या कवितेतील दुर्बोधतेला सुध्दा 'दुर्बोधता' न म्हणता 'गूढगुंजन', 'अज्ञेयता' असेच संबोधले जाते. याच अनुषंगाने असाही प्रश्न उपस्थित होऊ शकतो की, केशवसुतांदींची कविता 'गूढगुंजनात्मक' किंवा 'अज्ञेय' आणि मर्ढेकर-ग्रेस आदींची कविता मात्र 'दुर्बोध' असे का? कारण 'झपूर्झा' किंवा 'हरपले श्रेय' किंवा 'चाफा' अशा केशवसुत 'बी' यांच्या कवितेतील अज्ञेय भावार्थाचे आकलन अगदी अध्यात्माच्या वा अलौकिकाच्या पातळीवरूनसुध्दा होत नाही.

हर्षखेद ते मावळले,
हास्य निमाले,
अश्रु पळाले;
कंटकशल्ये बोथटली,
मखमालीची लव वठली;
काही न दिसे दृष्टीला
प्रकाश गेला
तिमिर हरपला;
काय म्हणावे या स्थितिला ? -
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

कवीची ही अवस्था 'ईशसामीप्यप्रतीती' मुळे झाली आहे असे म्हणता येत नाही. कारण याच कवितेत ज्ञानाच्या पलिकडे 'धीरत्व धरून। उड्डाण करून ।' गेल्यावरच गूढगीते ऐकावयास मिळतात असा कवीने अनुभव सांगितला आहे. खरे तर ईश्वराच्या सगुण-निर्गुण भेटीनंतर 'ब्रहमानंदाच्या डोही' आनंदाचेच तरंग उठतात. पण कवीच्या मनाची स्थिती मात्र अनाकलनीय झाली आहे. त्याचे वर्णन कवीला करता येत नाही. म्हणूनच ही कविता गूढगुंजनात्मक आहे पण दुर्बोध नाही. असा विचार श्री.के.क्षीरसागर यांनी मांडला आहे. ते म्हणतात, ''दुर्बोधता ही गूढगुंजनाची अपरिहार्य सहचरी होय, ही या क्षेत्रातील दुसरी कुकल्पना होय. दुर्बोधता आणि सहेतुक अस्फुटता ही गूढकाव्याची प्रमुख लक्षणे नव्हेत; दुर्बोधता हा तर उघड दोषच होय.''[१३]

म्हणजे श्री.के.क्षीरसागर केशवसुतादी कवितेतील दुर्बोधता ही 'दुर्बोधता' नसून ते गूढगुंजन आहे असेच मानतात. असे असले तरीही केशवसुतांची 'हरपले श्रेय' ही कविता, कवी 'बी' यांच्या 'चाफा', 'वेडगाणे', 'पिंगा' अशा कविता गूढ न वाटता काही मर्यादेपर्यंत मला दुर्बोध वाटतात. याबाबत श्री.के.क्षीरसागर म्हणतात, '' पण दुर्बोधता म्हणजेच 'गूढता' अशी कल्पना असावी. दुर्दैवाने स्पष्ट पण खोल अशा गूढवादी कवितांपेक्षा दुर्बोधत्वामुळे 'गूढ' अशा कविताच मराठीत अधिक गाजल्या आहेत.''[१४]

याचा अर्थ असा होऊ शकतो की, क्लिष्टता आणि दुर्बोधता यांचा प्रवेश केशवसुतांच्या कवितेपासून झाला आहे, असेच श्री.के.क्षीरसागरांना वाटते.

या उलट दि.के.बेडेकर म्हणतात,''अगदी अलिकडची मराठीतील कविता फार दुर्बोध आहे. मर्ढेकरांपासूनच ही दुर्बोधतेची अनिष्ट प्रथा चालू झाली आहे असे पुष्कळदा म्हटले जाते. या म्हणण्यात काहीसा अर्थ आहे आणि यामुळे म्हणा, अर्थ हा यक्षप्रश्न झाला आहे. मोकळया मनाने, समंजसवृत्तीने निर्णयापेक्षा चाचपडत्या शोधाला महत्व देऊन या प्रश्नाची चर्चा आज करायला हवी''[१५]

रा.श्री.जोग म्हणतात,''गेल्या ३० वर्षांच्या अवधीत आपल्या जीवनात अनेक प्रकारचे बदल झाले आहेत, तसे ते आपल्या वाङ्मयात, म्हणजे साहित्यात ते अधिक प्रमाणात झाले आहेत. आजच्या माझ्या विचाराचा विषय असलेली गोष्ट एकच आहे आणि ती म्हणजे त्या नवत्वाशी अनेक वेळा संबध्द असणारी दुर्बोधता होय. नववाङ्मयातील दुर्बोधता होय. नववाङ्मयातील दुर्बोधता आता स्थिरपद झालेली आहे.''[१६]

गो.वि.करंदीकर म्हणतात, ''अर्वाचीन मराठी कवितेतील दुर्बोधतेचा विचार करताना नवकाव्यपूर्व दुर्बोधता, नवकाव्यातील दुर्बोधता आणि नवकाव्योत्तर दुर्बोधता अशा दुर्बोधतेच्या तीन निरनिराळ्या अवस्था डोळस टीकाकाराला जाणवू शकतील. पहिली अवस्था ही केशवसुतांची 'झपूर्झा' किंवा 'बी' यांची 'चाफा' या कवितांनी सूचित होते. दुसरी अवस्था मर्ढेकरांच्या 'पिपात मेले ओल्या उंदीर' या कवितेने सूचित होते, तर तिसरी अवस्था ही अरूण कोल्हटकरांच्या 'घोडा' या कवितेने सूचित होते.''[१७]

गो.वि.करंदीकर यांनी स्वतःसह मुक्तिबोध, चित्रे, ग्रेस आदी कवींचा उल्लेख केला नाही.

श्री.के.क्षीरसागर, गो.वि.करंदीकर इत्यादींच्या मते दुर्बोधता ही केशवसुतांपासून, आधुनिक कवितेपासून प्रवेशकर्ती झाली तर दि.के.बेडेकर, रा.श्री.जोग इत्यादी समीक्षकांच्या मते दुर्बोधता ही नवकाव्यापासून, म्हणजेच मर्ढेकरांपासून आली.

मराठी कवितेतील दुर्बोधतेचा प्रवेश व त्याची कारणे -

दुर्बोधतेविषयी एवढी चर्चा झाल्यानंतर साहजिकच मराठी कवितेत दुर्बोधतेचा प्रवेश आणि तिच्या कारणांचा विचार क्रमप्राप्त ठरतो.

२० व्या शतकाच्या प्रारंभी मराठी कवितेने नवे वळण घेतले. नवे वैज्ञानिक शोध, दुसरे महायुध्द नव्या औद्योगिक संस्कृतीचा उदय, शहरीकरण, त्यातूनच उद्‌भवलेली गुन्हेगारी, धार्मिक दंगली यामुळे प्रस्थापित मूल्यांना मूल्यव्यवस्थेला जोरदार हादरे बसले. दुसऱ्या महायुध्दात झालेल्या प्रलयंकारी अणुबाँबचा वापर आणि त्यातून घडलेल्या विध्वंसामुळे सर्व जगावर भीतीचे आणि दहशतीचे सावट पडले. विश्वमानस भयकंपित झाले. जीवनाचे क्षणभंगुरत्व, मानवी देहाची नष्ट झालेली मौलिकता यामुळे मानवी समाजाच्या विचार-वर्तनाची, जीवनविषयक तत्वज्ञानाची दिशाच बदलली. साम्राज्यशाहीचा उदय, आर्थिक विषमता, धनाधिष्ठित समाजव्यवस्थेची निर्मिती, दहशतवाद आणि या सर्वातून घडलेला नैतिकमूल्यांचा नाश. ही प्रचंड उलथापालथ जगाप्रमाणेच भारतीय व मराठी संस्कृतीपुढेही नवी आव्हाने, नव्या समस्या निर्माण करीत राहिली.

या वैश्विक गदारोळातच फ्रॉईडच्या मनोविज्ञानाची भर पडली. सिग्मंड फ्रॉईडच्या मनोविश्लेषणात्मक सिध्दातांनी सगळे जगच विशेषतः बुध्दीवादी व संवेदनशील समाजघटक अचंबित झाले. फ्रॉईडने करून दिलेली मानवी मनाची ओळख आणि जीवनव्यापकत्व सर्व जगाला थक्क करून गेले आणि संपूर्ण साहित्यविश्वालाच कलाटणी मिळाली. फ्रॉईड बरोबरच मार्क्स, रसेल, आईन्स्टाईन अशा विविध व्यक्तींच्या मतप्रणालींनी, विचारधारांनी, वैज्ञानिक शोधांनी मानवी समाज ढवळून निघाला. याबाबत दि.के.बेडेकर म्हणतात, "मार्क्स, फ्रॉईड, रसेल,आईन्स्टाईन यांनी माणसाच्या व्यक्तित्वाबद्दलच्या आणि वास्तवाबद्दलच्या कल्पनाच बदलून टाकल्या. त्यामुळे व्यक्तित्व आणि वास्तव हे तर्काच्या, तर्कवाणीच्या, जाणीवेच्या चिमटीत येत नसल्याची जाणीव कलावंतांना झाली. आणि इतर भाषांप्रमाणे मराठी साहित्यिकांनी हे आव्हान स्वीकारले. आपल्या भूमिकेचा, माध्यमाचा व वाहनाचा विचार केला आणि मराठी साहित्यक्षेत्रात एकदम चैतन्य स्फुरण पावले. क्रांतीच झाली. नवसाहित्याचा, नवकवितेचा उदय झाला.

जीवनाचा अनुभव घ्यावयाचा तो केवळ संवेदना, अनुमान व जाणीव यांच्यापुरताच असून भागणार नाही. त्यात कल्पना, स्मृती, साहचर्य या साऱ्यांचाच समावेश झाला पाहिजे. तरच अनुभवाचा साकल्याने प्रत्यय येऊ शकेल. साहित्यात आपला अनुभव व्यक्त करावयाचा तोही केवळ तर्कसंगती सूचित करणाऱ्या, जाणीवेचे आलेखन करणाऱ्या भाषापध्दतीने नव्हे, ही भाषापध्दती विश्लेषणात्मक व वर्णनपर असते. 'प्रचलित भाषा' हे वाहन शास्त्र जसे वापरते तसे ते आपणासही वापरावेच लागेल. पण शास्त्र जसे प्रचलित भाषेचा आश्रय घेत घेत तिच्यापेक्षा वेगळी अशी परिभाषा तयार करते, तशी आपणासही साहित्याची अशी परिभाषा तयार करावी लागेल. आपल्या अनुभव विषयातील घटकांचा साकल्याने संवेदना, तर्क,कल्पना, स्मृती, साहचर्य, जाणीव-नेणीव इत्यादी प्रत्यय देण्यासाठी. ही साहित्याची परिभाषा म्हणजेच प्रतिमा. प्रतिमा ही जाणीवेला सोबत घेऊनच पण नेणीवेतून स्फुरत असते; प्रतिमा ही जाणीवेला स्पर्श करून पण नेणिवेपर्यंत जाऊन पोचत असते. कादंबरी आणि नाटक या वाङ्मयप्रकारापेक्षा काव्य आणि कथा या वाङ्मयप्रकारात ही नवी भूमिका, हे नवे काव्यशास्त्र स्वीकारते."[१८]

या साहित्याच्या प्रतिमांच्या परिभाषेमुळे नवकाव्यात दुर्बोधता आली. नव्या प्रतिमासृष्टींचा वापर नवकाव्यात झाल्यामुळे दुर्बोधता येऊ लागली. नव्या जाणीवा-

नेणिवांचा आविष्कार करण्यासाठी नवी प्रतिमायोजना वाचकांना अपरिचित होती. त्यामुळेच त्यांना ती दुर्बोध वाटू लागली.

वैचारिक परिवर्तन ईश्वर आणि मानवी मर्यादा या बाबतही घडून आले. विज्ञानामुळे ब्रहमांडाच्या अगाधपणाची जाणीव मानवाला झाली पण त्याबरोबरच विश्वदर्शनाचा ध्यासही मानवाला लागला. आपली सर्व तर्कबुध्दी पणाला लावून तो विश्वाच्या पसाऱ्याचा धुंडाळा घेऊ लागला. पण ब्रहमांडाच्या महाप्रचंड, अनंत, व्यवहाराचे गूढ इंद्रिय ज्ञानाने आणि बुध्दीसामर्थ्याने उलगडू शकत नाही ही जाणीव मानवाला झाली. विज्ञानाला आणि मानवी बुध्दीला विश्वाचा विस्तार, अंतरिक्ष आणि त्यातील आकाशगंगा, नक्षत्रमाला, सूर्यमाला या सर्वांना मोजण्याचे परिमाण गवसत नाही याचे भान आले आणि तो अस्वस्थ झाला. अखिल विश्वाच्या व्यापाचा आरंभ बिंदू आणि अंतिम बिंदू शोधण्यासाठी धडपडू लागला. पण तो त्याला सापडेना. पण याबरोबरच त्याचा देवावरचा विश्वासही तो गमावू लागला. जीवनाचा शोध आणि ब्रहमांडाचा वेध घेण्यासाठी देवाचा आधार घेण्याची ही त्याची तयारी नव्हती त्याची आस्तिक्यबुध्दी डळमळीत झाली पण ती पूर्णतः नष्टही झाली नाही. त्याच्या श्रध्दा अस्थिर झाल्या, काही वेळा लोपही पावल्या पण नवी श्रध्दास्थानेही त्याला निर्माण करता येईनात. मानवाचे हे विश्वाच्या पसाऱ्यातील क्षुद्रपण, छोटेपण त्याला सैरभैर करून गेले. श्रध्दांना तडा गेल्याने तो दिशाहीन झाला. हे सगळे डहुळलेपण नवकाव्यात प्रतिबिंबीत झाले आणि नवकाव्यात अस्पष्टता, संदिग्धता येत गेली आणि दुर्बोधता पण आली.

अनेक आधुनिक विचारप्रणालींमुळे मानवी समाजाची समाजशास्त्रीय दृष्टी विस्तृत झाली. व्यक्तीस्वातंत्र्याचा प्रभाव वाढला. अर्थार्जनाची साधने, श्रमव्यवस्था, श्रममूल्य, मानवी हक्क यामार्गानेही जीवनाच्या स्थिती-गतीचा विचार करता येईल ही जाणीव समाज मनाला झाली आणि समाजात विचार-परिवर्तनाची जोरदार लाट आली. राज्यसंस्था, विवाहसंस्था, कुटुंबसंस्था या सगळयांची पुनर्घटना केली पाहिजे याचे भान आले. योग्य-अयोग्य, पाप-पुण्य, धर्म-अधर्म, नैतिकता-अनैतिकता, शुभ-अशुभ, श्रध्दा-अंधश्रध्दा या संकल्पनाच आमूलाग्र बदलल्या पाहिजेत अशा विचारांकडे मानवी समाज संक्रमित झाला. हे संक्रमण नवकवितेत प्रभावीपणे येऊ लागले. युगायुगाच्या प्रस्थापित

संकल्पनांचा फेरविचार होताना नावीन्य आणि त्यातील अपरिचितता याच्यामुळे नवकविता दुर्बोध वाटू लागली.

अशा या सगळया उलथापालथीच्या, परिवर्तनाच्या, वैचारिक मंथनाच्या आणि विज्ञानाच्या भरारीच्या गतिमान संक्रमणाबरोबर मानवी जीवनही गतिमान बनले. या गतिमान जीवनाचा शोध नवकाव्य घेऊ लागले. पण त्याबरोबरच आत्मशोधही घेऊ लागले. हा आत्मशोध घेता घेताच नवकविता आत्मकेंद्री, कमालीची आत्मकेंद्री, आत्ममग्न झाली. आणि कवितेत व्यक्तिगतता आली. त्या अनुषंगाने कविता दुर्बोध होऊ लागली. कवीचे व्यक्तिगत खाजगी अनुभव वाचकाला, रसिकाला आकलन होणे कठीण जाऊ लागले.

वर उल्लेखलेली ही नवी जीवनदृष्टी, नवे परिवर्तन, नवे संक्रमण, जीवनशोध आणि आत्मशोध नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी नवकवी प्रयत्न करू लागले. पण त्यासाठी त्यांना जुनेच शब्द, त्याच त्याच वापरून गुळगुळीत झालेल्या प्रतिमा नकोशा वाटू लागल्या. नवे अनुभव, नव्या जाणिवा नव्या शब्दातून, नव्या प्रतिमांतून मांडल्या जाऊ लागल्या. ही नवी भाषा, नवी शब्दजोडणी प्रथम मर्ढेकरांनी मराठी कवितेत आणली. नवकवींच्या या भाषेविषयक समस्येतून कवितेत दुर्बोधता आली. या संदर्भात विजया राजाध्यक्ष म्हणतात,''कवीच्या दृष्टीने विचार केला पाहिजे. त्याला स्वतःच्या आविष्कारासाठी प्रचलित भाषा हे परिपूर्ण साधन आहे असे वाटत नाही. ते तसे नसतेही. कवीमनातील प्रत्येक तरल भाव किंवा प्रतिमा नेमकेपणाने व्यक्त करू शकणारे शब्द भाषेत तयार नसतात; अतिरिक्त उपयोगामुळे अनेक शब्दांचे अर्थ फिके मोघम होऊन बसतात; त्यांची धार उतरते. अशा अनेक कारणांमुळे कवीला संपूर्ण आविष्कारसिध्दीसाठी स्वातंत्र्य घेणे क्रमप्राप्तच ठरते.[१९]

भाषेचा तोकडेपणा वाचकांना जाणवला नाही तरी कवीला आत्माविष्काराच्यावेळी जाणवतो. मग कवी भाषेला नवेरूप देतो. वेगळेच रूप देतो. पण वाचकाला हे भाषेचे वेगळे रूप परिचित नसते म्हणून त्याला कविता दुर्बोध वाटू लागते.

प्रत्येक वेळेला भाषेचा तोकडेपणा हीच बाब कवितेला दुर्बोध करते असे नाही. तर कवीचा अनुभव जर कमालीचा व्यक्तिगत असेल तर तो ही वाचकांना चटकन आकलन होईलच असे नाही. याबाबतीत 'खाजगीपण' हे दुर्बोधतेचे कारण बनते. कवीची

अनुभूती अत्यंत खाजगी असेल तर, त्यातील परिस्थिती, स्थलकाल संदर्भ; व्यक्तीसंदर्भ, भावतरंग हे कमालीचे वैयक्तिक असतात. त्यामुळे वाचकांना अशी काव्यगत अनुभूती दुर्बोध वाटते. या संदर्भात रा.श्री.जोग तात्विक व मूलभूत विचार मांडताना दिसतात. कवितेचे स्वरूप व प्रयोजन 'स्वार्थपर' आहे की 'परार्थपर' आहे यावर कवितेतील शब्द, आशय, अर्थ योजना अवलंबून आहे असे त्यांना वाटते. या संदर्भात रा.श्री.जोग म्हणतात,"आपल्यास जे प्रामाणिकपणे वाटले, अनुभवास आले ते तसेच प्रामाणिकपणे व्यक्त करणे ही स्वतःबद्दलचीच जबाबदारी म्हणावी लागेल. या भूमिकेतून दोन वृत्ती स्वाभाविकपणेच संभवतात. त्यातील पहिली म्हणजे आपली कविता, आपल्या मनातील अर्थ इतर कोणास सहजपणे संपूर्ण आणि स्पष्टपणे समजलाच पाहिजे असे नाही, ही वृत्ती होय. या भूमिकेतून दोन वृत्ती होय. आणि दुसरे म्हणजे आपले काव्य स्वार्थ असल्याने आपल्या या आत्मोद्गारात खासगी आणि सार्वजनिक असे द्वैध मानण्याची आवश्यकता नाही, सर्वच खासगी आहे ही वृत्ती. पहिल्या वृत्तीमधून दुर्बोधतेला अवसर मिळतो."[२०]

प्रा.रा.श्री.जोग यांनी कवितेत दुर्बोधता येण्याचे कारण कविता 'स्वार्थपर' असणे हे सांगितले आहे. अर्थात या कारणमिमांसेत निश्चितच तथ्य आहे. पण या विधानातून दोन वृत्ती सांगितल्या आहेत.

१) आपली कविता इतर कोणास सहजपणे, संपूर्ण आणि स्पष्टपणे समजलीच पाहिजे असे नाही, ही वृत्ती.

२) आपले काव्य स्वार्थ असल्याने कवीची कविता आत्मोद्गार असूनही ती खासगी आणि सार्वजनिक अशी दोन्ही किंवा दोन्ही एकच आहे.

याबाबत रा.श्री.जोग म्हणतात, "कला स्वार्थ असेल, तर ती सुबोध-दुर्बोध आहे याविषयीचा विचारच करण्याचे कारण नाही. सुबोध-दुर्बोधतेचा प्रश्न म्हणजे अर्थसंक्रमणाचा प्रश्न होय, आणि अर्थ संक्रमित करावयाचा म्हणजे, श्रोता, रसिक कोणीतरी पाहिजेतच. व्यक्ती एकटीच असेल, समाज निबध्द नसेल, तर ज्याप्रमाणे कोणताही नैतिक स्वरूपाचा विचार उद्भवत नाही, त्या प्रमाणे कला ही स्वार्थ असेल तर, तिचा अर्थ दुसऱ्यास समजतो की नाही हा विचारही उद्भवण्याचे कारण नाही. पण आजपर्यंत कोणतीही कला रसिकावाचून जगू शकली आहे किंवा विकास पावली आहे असे दिसत नाही."[२१]

यातून काही प्रश्न निर्माण होऊ शकतात. पहिल्या वृत्तीबद्दल दुर्बोधतेचा मुद्दा घेऊन असे म्हणता येईल की, जर आपली कविता इतर कोणास सहजपणे, संपूर्ण, स्पष्ट समजलीच पाहिजे असे नाही ही वृत्ती कवीची असेल तर, कविता रसिकांसमोर आणण्यात कोणता हेतू अथवा कारण अभिप्रेत आहे? (अर्थात् अभिव्यक्तीस्वातंत्र्य हा मूलभूत हक्क येथे डावलण्याचा हेतू नाही हे ही स्पष्ट आहे.) कवीशिवाय इतरांना कोणालाही त्याची कविता समजलीच पाहिजे असे नाही या वृत्तीमुळेच स्वार्थ कवितेला रसिकांशी काहीही देणे घेणे नाही. अथवा रसिकांशी तिची कसलीही बांधीलकी नाही असा या कविवृत्ताचा तर्क लावायचा का? अशी स्वार्थपर कविता कवीने जरूर करावी पण ती रसिकांसमोर आणण्यासाठी धडपडू नये असाही टोकाचा विचार पुढे येऊ शकेल.

दुसऱ्या वृत्तीबद्दलचा संबंध दुर्बोधतेशी फारसा येत नसल्याने तो इथे अप्रस्तुत ठरेल.

पहिल्या मुद्द्याच्या संदर्भात असेही म्हणता येईल की, कविता अर्धवट काही अंशी समजली तर तिचा पूर्ण आस्वाद घेता येईल का? असा अंशतः अर्थाशयाचे आकलन रसिकाला कवितेपासून दूर घेऊन जाईल.

अशाप्रकारच्या अर्थाच्या अपुऱ्या अर्थसंघटनाविषयी विजया राजाध्यक्ष यांनी विवेचन केले आहे ते विवेचन असे, "वाचकाला गोंधळात टाकणारी आणखी एक गोष्ट म्हणजे एखाद्या कवितेतील फटी; मधल्या जागा. कवी सगळेच शब्दात सांगत नाही; काही सुचवितो व ते समजून घेणे वाचकावर सोपवितो. वाचकाने या मधल्या जागांमधील अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न केला नाही किंवा प्रयत्नांतीही तो त्याला समजला नाही तर त्याचा गोंधळ वाढतो."[२२]

अर्थात प्रा.रा.श्री.जोग यांचा मुद्दा वृत्तीशी संबंधित आहे आणि ती वृत्ती दुर्बोधतेला कारणीभूत ठरते, असे ते सुचवितात. तर विजया राजाध्यक्ष यांचे स्पष्टीकरण कवीच्या कवितेतील दुर्बोधतेच्या आक्षेपाबद्दल दिलेले आहे, हा फरक येथे विचारात घेणे अत्यावश्यक आहे. परंतु हे दोन्ही स्पष्टीकरणात्मक विचार दुर्बोधतेचीच कारणे सांगतात म्हणून त्यांचा येथे समावेश केला आहे.

वाङ्मयात सर्व विश्वातील विविध संस्कृतींच्या मिश्रणाचेही प्रतिबिंब पडते. हे प्रतिबिंब स्थल-काल सापेक्ष संदर्भासहित येते. नवकाव्यामध्ये हे प्रतिबिंब ठळक व

स्पष्टपणे दिसून येते. विज्ञानाने संपूर्ण जग जवळ आणल्याने विविध संस्कृतींची परस्परांना ओळख झाली. कॉस्मॉपॉलिटन संस्कृतीचा उदय झाला. दुसऱ्या महायुध्दात कर्ती माणसे आणि तरूण पिढी मारली गेल्यामुळे स्त्री-जीवनाला कलाटणी मिळाली. स्त्री शिक्षणासाठी, अर्थार्जनासाठी उंबरठयाबाहेर पडली. व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार सर्वमान्य झाला. आणि मानसशास्त्राच्या परिचयामुळे व्यक्तीच्या वर्तनाचा विचार केवळ सामाजिक, भावनिक, रूढीपरंपरागत सांस्कृतिक पातळीवर न करता तो मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून होऊ लागला.

विवाहसंस्थेचा पुनर्विचार होऊ लागला. स्त्री-पुरूष नात्याला अनेक परिमाणे प्राप्त झाली. आई-मुलगा, वडील-मुलगी, भाऊ-बहीण, पती-पत्नी अशा नात्यांचाही विचार फ्रॉईड-युंग यांच्या मनोविज्ञानाच्या आधारे होऊ लागला. स्त्री-पुरूषातील सनातन संबंधाचा शोध परंपरागत सांस्कृतिक विचारांच्या व समजुतींच्या पार्श्वभूमीवर न घेता तो मानसशास्त्राच्या मनोविश्लेषणात्मक सिध्दांतावर घेतला जाऊ लागला.

'प्रेम' या संकल्पनेला केवळ दैवी, अलौकिक पातळीवर न ठेवता तिला दैहिक, इंद्रिय पातळीवर आणले.

जीवनमूल्ये आणि वास्तवजीवनातील त्यांचे स्थान व ऱ्हास यांची जाणीव होऊन नवीन जीवनमूल्ये प्रस्थापित होऊ लागली.

वरील सर्व सांस्कृतिक अभिसरणाचा, बदलत्या संकल्पनांचा आणि जीवनमूल्यांचा आविष्कार नवकवितेत होताना तिच्या नवीनतेबरोबरच दुर्बोधताही आली. केवळ पारंपारिक, आदर्श, उत्तम व श्रेयस असणारी कविता आजपर्यंत निर्माण होत होती. पण या नव्या वळणावर वास्तव सांगणारी, इंद्रिय पातळीवर राहणारी, प्रेयस कविता निर्माण होऊ लागली. तिच्यात सामाजिकतेबरोबर व्यक्तिगतता पण आली. या नव्या संमिश्र सांस्कृतिक जीवनातील नव्या जाणिवा, नव्या अनुभूती, नव्या संकल्पनांच्या नव्या भावसंवेदना व्यक्त करताना कविता दुर्बोध होऊ लागली. या दुर्बोधतेच्या मागे नवकाव्याची एक वेगळी काव्यविषयक भूमिका आहे असे गंगाधर गाडगीळ यांना वाटते. म्हणूनच ते म्हणतात, ''नवकाव्याच्या मागे एक वेगळी काव्यविषयक भूमिका आहे आणि त्या भूमिकेमुळेच हया काव्यातील तथाकथित दोष निर्माण झाले असणे शक्य आहे. (हा 'तथाकथित दोष म्हणजे 'दुर्बोधता' होय) काव्याची रचना तर्कप्रधान नसते. तार्किक

संगतीला काव्यात जे स्थान असते ते गौण आणि आनुषंगिक असते. कवी जो आशय व्यक्त करीत असतो तोच मुळी वेगळा असतो. नवकवि अमूर्त अनुभवांचा आकार शोधीत असतो त्यामुळे त्याच्या हातून चुका होण्याची शक्यता अधिक आणि त्या चुका लक्षात येणेदेखील अवघड.''[२३]

गंगाधर गाडगीळ नवकवितेतील दुर्बोतेचे समर्थक आहेत. त्यामुळे 'नवकविंच्या काव्यविषयक तात्त्विक भूमिके'तच नवकवितेतील दुर्बोधतेचे कारण आहे असे त्यांना वाटते.

गाडगीळांनी दुर्बोधतेचे कारण सांगणे हे पटते. तसेच ते दुर्बोधता अमान्यही करीत नाहीत. परंतु 'दुर्बोधता हे काव्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे' असे जेव्हा ते ठणकावून सांगतात त्याचवेळी ते त्या दुर्बोधतेला अर्थदृष्टया, आस्वादकाच्या भूमिकेतून कसे सामोरे जावयाचे हेही सांगण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच ते नवकवितेतील दुर्बोधतेकडे सौम्य दृष्टीने पाहतात. कारण वर उल्लेखिलेल्या नव्या संकलपना,नव्या जाणिवा, नव्या अनुभूती आविष्कृत करताना कवितेत दुर्बोधता येणे स्वाभाविकच आहे असे त्यांना वाटते.

या नवकवितेतील 'प्रतिमासृष्टी' अगदी नवी आहे. तसेच कवीची 'प्रतिभा' या संकल्पनेची प्रत अथवा दर्जा याबद्दलच्या विचारातही नवीनता आली. या नवकवितेच्या नवकवींची प्रतिभा, नवे उन्मेष घेऊन आली आणि तिने आपली 'प्रतिमासृष्टी' पूर्णतः नवीच निर्माण केली. या नव्या प्रतिमांमुळे नवकविता दुर्बोध होऊ लागली.

वास्तवाचे विदारकरूप, जीवनाचे भयावह दर्शन पाहून भांबावलेली मने सुखाची, आनंदाची नवी स्थाने आणि परिमाणे शोधू लागली. जीवनाच्या सर्वच अंगानी नवी कविता सांस्कृतिक, वैचारिक, भावनिक, सामाजिक पातळीवर संघर्ष करू लागली. मूल्यांचा, सुखाचा, आत्मानंदाचा जीवनरहस्याचा शोध नव्या दृष्टीने, नव्या प्रतिमासृष्टीने घेऊ लागली. अनेक रंग एकत्र मिसळल्यानंतर प्रत्येक रंग स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व टिकवू शकत नाही हे खरे असले तरीही, प्रत्येक मन स्वतंत्र अस्तित्वासाठी आणि ते टिकविण्यासाठी धडपड करू लागेल. या सर्व व्यामिश्र, संमिश्र विस्तृत आणि सर्वस्पर्शी घटनांच्या साद-पडसादासहित नवकविता अवतीर्ण झाली. तिच्यातील दुर्बोधतेची कारणे यातच दडलेली आहेत. देहावरची त्वचा ज्याप्रमाणे देहावरचा अंतिम पण अविभाज्य घटक असते; त्याचप्रमाणे दुर्बोधता ही नवकवितेचा अविभाज्य घटक बनली. देहाचा अंतिम थर म्हणून

त्वचा वेगळी काढू पाहता देह रक्तबंबाळ होतो तद्वतच नवकवितेतील दुर्बोधता काढू पाहता होते.

कवी ग्रेस यांच्या कवितेतील दुर्बोधतेसंबंधी -

या पार्श्वभूमीवर ग्रेस यांच्या कवितेतील दुर्बोधतेचा विचार करणे आवश्यक आहे. सन १९५७ पासून आजतागायत कवी ग्रेस काव्यनिर्मिती करीत आहेत. मराठी काव्यक्षेत्रात ते आता चांगले स्थिरस्थावर झालेले आहेत. पण ग्रेस यांचे नाव घेतले की आपोआपच 'दुर्बोधता' हा शब्द नजरेसमोर येतो. ग्रेस = दुर्बोधता असे जणु समीकरणच बनले आहे असे वाटते. आज जवळजवळ ४०-४५ वर्षे ते काव्यनिर्मिती आणि ललितनिबंध लेखन करीत आहेत. त्यांचा अत्यंत विशिष्ट असा चाहता वाचकवर्ग निर्माण करण्यात ते यशस्वी झाले असले तरीही त्या यशाबरोबरच 'दुर्बोध कवी' हे दूषणही त्यांना चिकटलेले आहे. स्वतः ग्रेसही ते काही अंशी मान्य करताना दिसतात. तर काहीवेळा ते स्वतःच्या कवितेला दुर्बोध म्हणवून घेण्यातच समाधान मानताना दिसतात. याबाबत जयंत परांजपे म्हणतात, ''ग्रेस यांच्या कवितेतील दुर्बोधतेची कारणमिमांसा शोधून काढण्याऐवजी दुर्बोधतेचेच कौतुक होऊ लागले. कवीदेखील स्वतःला दुर्बोध म्हणवून घेण्यात धन्यता मानू लागला.''[२४]

ग्रेस यांच्या कविता वाचल्यानंतर बव्हंशी कवितांचे आशयार्थसंघटन निर्माण होत नाही. त्यांच्या कवितेतून अतार्किक अनुभव मिळत जातो आणि मग त्यांच्या काव्यार्थाचे तर्कनिष्ठ आकलन होत नाही. सलग आशय शोधताना रसिकांची ओढाताण होते.

'संध्याकाळची कविता' आणि 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या दोन्ही काव्यसंग्रहातील कविता वाचताना एक गोष्ट जाणवते की, त्यांचा पहिला कवितासंग्रह 'संध्याकाळच्या कविता' यातील काही कविता हया दुर्बोध आहेतच. म्हणजे दुर्बोधता ही त्यांच्या कवितेत प्रथमपासूनच आहे. त्यांचे 'राजपुत्र आणि डार्लिंग' आणि 'सांध्यपर्वातील वैष्णवी' या दोन कवितासंग्रहातील कविता आणखी अधिक दुर्बोध आणि व्यक्तिगत वाटतात. इतकेच काय पण त्यांचे गद्य ललित लेखनही दुर्बोध वाटते. त्याचे पूर्णतः आकलन होत नाही. ग्रेस यांच्या कवितेतील दुर्बोधतेबद्दल जयंत परांजपे म्हणतात, ''दुर्बोधतेच्या अनुषंगाने इथे एक विचार सुचतो. ग्रेस यांच्या कवितेतील दुर्बोधतेची मिमांसा

करताना या दुर्बोधतेच्या मुळाशी असलेले एखादे सर्वसमावेशक सूत्र आपल्याला सापडते काय याचा शोध घेण्याचा मोह होतो आणि असे सर्वसमावेशक सूत्र सापडत नाही तेव्हा आपण हताश होतो. निव्वळ फँटसीच्यास पातळीवरची कविता, उखाणे टाकणारी कविता, जीवनानुभवात वेगवेगळ्या टप्प्यावर स्फुरलेली कविता, आणि कवीला अंतर्यामी सतत अस्वस्थ करणाऱ्या पुर्वानुभवाशी निगडीत कविता या एकाच दावणीला बांधून उकल करण्याचा प्रयत्न हा आपल्यालाच हतबल करणारा ठरण्याची शक्यता असते.''[२५]

दुर्बोधतेच्या या संमिश्र मतांच्या गलबल्यात स्वतः ग्रेस आपल्याला कवितेतील दुर्बोधतेविषयी भाष्य करताना दिसतात. या संदर्भात त्यांच्या मुलाखतीचा काही भाग येथे जसाच्या तसा उद्धृत करणे अपरिहार्य आहे. डॉ.अक्षयकुमार काळे यांनी ग्रेस यांची प्रदीर्घ मुलाखत घेतली आहे. त्यातील दुर्बोधतेशी संबंधित प्रश्नोत्तरे पुढीलप्रमाणे -

प्रश्न - डॉ.अक्षयकुमार काळे - आपली निर्मिती अतिशय जटिल आणि व्यामिश्र आहे. तिची मराठी काव्यपरंपरेपासून रचनेच्या व अबोध आशयाच्या दृष्टीने पृथगात्मता स्पष्ट आहे. रसिकांना ती मोहित करून आपल्या विळख्यात बध्द करते. परंतु आशयासाठी रसिकाची कुतरओढ होऊन दुर्बोधतेच्या गजावर डोके आपटून तो रक्तबंबाळ होतो. तुमच्या पूर्वसूरींमध्येही अशी दुर्बोधता आढळत नाही. त्यामुळे दुर्बोधतेच्या वांशिक शोधाचाही दुवा हरवला आहे. तो रसिकांनी कसा शोधावा?

उत्तर - ग्रेस - मराठी वाङ्मय परंपरेचा अनुवंश, आशय, निर्मितीची प्रक्रिया व निर्मितीची आस्वादप्रक्रिया या संदर्भात मी घेतलेला नाही. तसा घेतला असता तर तुम्हाला माझी परंपरा अचूक दाखविता आली असती. आणि मग दुर्बोधतेच्या प्रश्नाचाही आपोआपच परिहार झाला असता. ही मुळातच अनवट बीजसंभवाची निर्मिती आहे. म्हणून हेतू कितीही चांगला असला तरीही या कवितेचे अनुकरण कोसळून पडते. खरे तर ही माझी निर्मिती या अर्थाने इतकी पृथगात्म आहे, की या वंशाची परंपराच संभवू शकत नाही. म्हणून मी म्हटले आहे, ''फिरूनि फिरूनि माझा वंश निर्वंश होई'' अनुभव ग्रहणाची व अनुभवाच्या अभिव्यक्तीची कोणती जुनी, नवी व रूढ परंपरा मी स्वीकारलेली नाही. (त्याही बाबतीत मलानिवड स्वातंत्र्य नाही. इथेही मी संचिताकडेच बोट दाखवतो.) दुर्बोधतेची बीजे ही इथे आहेत. कार्यकारणभावाची तार्किक जपणूक किंवा तार्किक भान (लॉजिकल अवेअरनेस) माझ्या काव्यात नाही. पण जी भाषा मी वापरतो ती भाषा संस्कृतीची, समाजाची, राष्ट्राची व

जीवनव्यवहाराची भाषा आहे. आणि ही भाषा वापरणारा घटक जनावर नसून माणूसच आहे. त्यामुळे अनुभवाच्या मुळाशी तार्किक एकात्मता असतेच असते. नाही तर या कवितेने मेंदूचे भान उडवीत उडवीतच नेमके हृदयस्थ संवेदनांना कसे झपाटून टाकले असते? पण याचा अर्थ असा मात्र नव्हे की, की 'व्यंगार्थासाठी' 'वाच्यार्था' चा बळी देत असतो.

वाकीफ खूब इष्ककी तर्जे बयाँसे मैं।
ऐसे में तुझको ढूँडके लाऊँ कहाँसे मैं।

असे आहे हे. जसे -

दिशांनी मला आज रंगांध केले
कुण्या मंद्र तंद्रीत रे साजणा
फिरे हात मेघांवरी सारखा अन्
तुटे शुभ्र संवेदनेचा कणा...

डॉ.काळे, अशा निर्मितीचा अनुवंश माझ्या भाषेत नसला तरीही तो जागतिक काव्यात नाही असे मी कसे म्हणू? मग मला माझे सहोदर कसे सापडले असते?

तार्किक भान व तार्किक एकात्मता ही काव्यमूल्ये नाहीत. दुसरे असे की, ही कविता भाषिक पातळीवर दुर्बोध नाही. हया कवितेत आलेल्या प्रत्येक शब्दाचा अर्थ संस्कृत मराठी शब्दकोशात आहे. जीवनव्यवहार व कृती यांचे अर्थ सोडविण्याक रता शब्दकोश, परंपरा व संस्कृती यांचे भाषिक संकेत आपण वापरतो. काव्याच्या सौंदर्य-संघटनात जे शब्द येतात त्यांचा अर्थ कोणत्या शब्दकोषात शोधावयाचा? सामाजिक भाषेतील शब्दांना इथे कवीने आपल्या व्यक्तिमत्वाचा अर्थ दिलेला असतो. म्हणून शब्द शेवटी कवितेत साधनरूपच ठरतात, माध्यमरूप नाहीत. कलावंताची भावानुभूती हे माध्यम असते. मी ही या प्रक्रियेला अंतिम तात्विक अर्थाने मान्यता देतोच. तरीही माझ्या कवितेतील शब्दांचे अस्तित्व या अंतिम तात्विक अर्थाच्या नंतरही जसेच्या तसेच शिल्लक का उरते याचाही विचार केला पाहिजे. अभिनवगुप्त मर्ढेकर काव्यनिर्मितीची प्रक्रिया कशी असावी या आदर्श अवस्थेचे दिग्दर्शन करतात असे मला वाटते - ती कशी असते याचा ठाव घेत नाहीत. गृहितकाची बगल देऊन तिला डोळयाआड करतात ! जशा माझ्या ओळी -

शब्दांच्या अर्थाचीही
मज कधी न आली करूणा
ये डाळीसाठी तरिही
कुणी पंखमोडली मैना

तशि सांजही आमुच्या दारी
येऊन थबकली होती
शब्दात अर्थ उगवावा
अर्थातून शब्द वगळता

अक्षयकुमार काळे - पण मग ही दुर्बोधता येते कुठून ?

ग्रेस - ती मांडणीच्या पातळीवर आहे. अद्‌भूताचे मला अचाट आकर्षण आहे. परंतु चमत्कृतीचे नाही. भाषेत मी चकवा फिरवतो असे म्हणतात. पण तसे नाही. दुर्बोधता मुख्यत्वेकरून अद्‌भूताच्या अवतरणामुळे येते. हे अद्‌भूत मांडणीच्यावेळी अनुभवांचे विभिन्न पदर इतक्या वेगाने परस्परात मिसळून टाकते की अद्‌भूताचा संबंध इथे एकदम वास्तवापासून तुटल्याचा भास होतो. आणि हे अद्‌भूत जाणिवेला तुडवून नेणिवेच्या प्रदेशात - स्वप्नभूमीत घेऊन जाते. पुन्हा मांडणी ही प्रतिमांच्या मंत्रोच्चारित चेटुकाप्रमाणे उभी राहते. शब्द भयाण, भरजरी व दीप्तीमान होतात. म्हणजे मांडणी मॅजिक पोएट्रीचा भास निर्माण करते. उपलब्ध असलेल्या भाषेची वापरात असलेली शक्ती इथे मला अपुरी पडते म्हणून मी भाषेची काव्यनिष्ठ व संगीताभिमुख पुनर्घटना करतो. इथे दुर्बोधता शिगेला पोचते - पण त्याचवेळी हे अग्निदिव्य स्वीकारण्याला माझी कविता तयार उभी असते. अक्षर गणवृत्ते आणि मात्रावृत्ते यांचे मला जे अतूट आकर्षण आहे याचे मूळ कारण मला इथे सापडते. अद्‌भूताची संमिश्र अनुभूती, मॅजिक पोएट्रीच्या पातळीवर झालेली तिची अभिव्यक्ती, कवीने आपल्या प्रतिभाबलाने त्यासाठी केलेली भाषेची काव्यनिष्ठ व संगीताभिमुख पुनर्घटना - हे सर्व म्हणजे मुळात अनुभूतीच उसळून येत नाही; निनादून येते, आणि ती आपल्या निनादस्वभावाचे आकार व त्या आकाराच्या वृत्ती शोधते.''[२६]

ग्रेस यांच्या वरील वक्तव्यावरून त्यांना आपल्या कवितेतील दुर्बोधता मान्य आहे. तिचे कारणही ते उकलून सांगतात. त्यांची कविता भाषिक पातळीवर दुर्बोध नाही तर ती मांडणीच्या पातळीवर आहे असे म्हणतात. पण आधी ते असेही म्हणतात की, अर्थातून

शब्द वगळला तर शब्दातून नवा अर्थ उगवावा म्हणजेच शब्दांचे अर्थ त्यांना हवे आहेत. तसे नवे अर्थ ते लावित असतीलही. त्यामुळेच कवितेत दुर्बोधता येत असण्याची शक्यता आहे.

पण जेव्हा ग्रेस ही दुर्बोधता मांडणीच्या पातळीवर येते, असे म्हणतात तेव्हा मात्र, रसिकांच्या मनात असा प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे की, ही दुर्बोधता शिथिल करण्यासाठी ते कवितेतील शब्दांची मांडणी बदलू शकतील की नाही? त्यासाठी काय करता येईल?

यासाठी कवितेवर संस्करण अथवा परिष्करण करता येईल असे वाटते. असे परिष्करण मांडणीच्या पातळीवरून आलेली दुर्बोधता कमी करू शकेल.

पण ग्रेस जेव्हा 'माझी कविता भाषिक पातळीवर दुर्बोध नाही' असे म्हणतात तेव्हा त्याचे हे वक्तव्य सहजपणे मान्य होत नाही. कारण त्यांच्या काव्यातून आणि ललित लेखनातून काही भाषिक जोडणी, शब्दजोडणी अशी आहे की त्या शाब्दिक जोडणीचा किंवा शब्दप्रयोगाचा अर्थ उकलत नाही. उदा.थेंबउणे ऊन, पाऊलपण, चरित्रकंपित पाणी, मरणगंधाचे दिवे, ओठांची मिथिला अशा शब्दप्रयोगामुळे भाषिक पातळीवर दुर्बोधता निर्माण करताना दिसतात.

कवितेत आलेल्या प्रत्येक शब्दाचा अर्थ संस्कृत मराठी शब्दकोशात आहे, असे ग्रेस म्हणतात. पण शब्दार्थावरून कवितांचे आशय-संघटन शोधायचे ही भूमिकाच चुकीची ठरेल. कारण कवितेची भाषा प्रतिमांची असते. काव्याच्या सौंदर्यसंघटनासाठी जे शब्द ग्रेस कवितेत उपयोजितात त्यांचाही अर्थ शब्दकोशाबाहेर असणार नाही. तरीही भाषिक पातळीवर दुर्बोधता येतेच.

ग्रेस यांच्या म्हणण्यानुसार 'शब्द शेवटी कवितेत साधनरूपच ठरतात, माध्यमरूप नाहीत.' हे मत ही स्वीकारार्ह नाही. आणि ते कोणीच स्वीकारणार नाही. कारण शब्द हे माध्यमरूपच असतात. ते साधनरूप कधीच नसतात. ज्याप्रमाणे संगीतकलेत तबला हे साधन आहे सूर हे माध्यम आहे. चित्रकलेत कुंचला हे साधन आहे रंग हे माध्यम आहे. त्याप्रमाणेच कवितेत शब्द हे माध्यम आहेत.

कलावंताला आपली भावानुभूती व्यक्त करण्यासाठी जे माध्यम लागते ते माध्यम म्हणजे शब्द होत. हे सर्वमान्य आहे.

'कलावंताची भावानुभूती हे माध्यम असते' असे ग्रेस म्हणतात. त्याबाबतही विचार करून पाहिल्यास भावानुभूती हे माध्यम असते हे वक्तव्य पटत नाही. अनुभव हा माध्यम कसे होऊ शकेल? संवेदनांनी, इंद्रियांनी, मेंदूने घेतलेली ती अनुभूती आहे. एखादी घटना, भावव्यवहार, विचार या घटितांना मानवाच्या संवेदनांनी, जाणीवांनी, ज्ञानेंद्रियांनी, मेंदूने आणि मनाने दिलेला साद-प्रतिसाद आणि त्यातून जाणवलेल्या भाव संवेदना, भावानुभूती असेच अनुभवाचे अल्पतः स्वरूप सांगता येईल. मग भावानुभूती ही माध्यम कसे होऊ शकेल? छेडलेला स्वर हवेच्या माध्यमातून कर्णेंद्रियांनी ऐकला की मधुर श्रवणाची अनुभूती येते. अनुभूती ही अनुभूती असते ती माध्यम कधीच नसते. काव्यनिर्मितीचा कारणीभूत घटक असते.

भाषेची काव्यनिष्ठ व संगीताभिमुख पुनर्घटना करताना दुर्बोधता शिगेला पोचते - असे ग्रेस म्हणतात. दुर्बोधता अद्‌भूताच्या अवतरणातून येते. असेही ग्रेस म्हणतात. अद्‌भूताच्या आकर्षणाबद्दल काहीच आक्षेपार्ह नाही. पण अद्‌भूत अनुभूतीच्या अवतरणामुळे दुर्बोधता येते हे मात्र मान्य होत नाही. अद्‌भूतता आकलनाच्या व तर्काच्या पलीकडे असते हे बरोबर आहे. पण अद्‌भूताचे अवतरण दुर्बोधता आणते हे मत स्वीकारार्ह वाटत नाही. तसे असते तर सर्व अद्‌भूतरम्य कविता, कादंबऱ्या दुर्बोध ठरल्या असत्या.

'ग्रेस' यांच्या कवितेतील दुर्बोधता याबाबत प्रा.डॉ.चं.वि.जोशी यांना दिलेल्या याबाबत स्पष्टीकरणाचा उल्लेख इथे करणे आवश्यक वाटते. ते प्रश्नोत्तरासहित पुढील प्रमाणे -

प्रश्न - डॉ.चं.वि.जोशी - परांजपे सरांनी 'दुर्बोधते'वर ग्रंथल लिहिला. तुमच्या मते...

उत्तर - ग्रेस - मला हे अभिप्रेतच होतं. जोशी, ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीची निर्मिती कोणासाठी केली? किती लोकांना ती कळली? तरीही तिची पारायणे होतातच. लिहिणारा दुर्बोध की ऐकणारा? तुम्ही कलाकृती कलावंतापेक्षा श्रेष्ठ मानता का? या श्रेष्ठतेबद्दल गैरसमज आहेत."

"मी दुर्बोध नाही."

"जीव,जगत्, अध्यात्म हे संतामध्ये असतं. या अध्यात्माची परिभाषाच वेगळी. म्हणून अशा रचनेचा अनुवंश नाही. अनुवंश नसल्याने ती 'दुर्बोध' वाटते. जोशी, म्हणूनच माझी कविता 'दुर्बोध'! आहे की नाही गंमत. सनातन भ्रम आहे हा."[२७]

दुर्बोधतेच्यासंबंधी ग्रेस यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाने त्यांच्या कवितेतील दुर्बोधतेचे कारण उलगडत नाहीच. उलट ग्रेस यांनी प्रश्नाला बगल देऊ न उत्तर देण्याचे टाळले आहे असे वाटते. तर नंतरच्या वक्तव्यापासून अनुवंशहीन आहे म्हणून ती दुर्बोध वाटते असेही ते म्हणतात.

खरे तर 'अनुवंशहीन' असे वाङ्मयात काहीच नसते. तरीही ग्रेस यांचे म्हणणे क्षणभर मान्य केले तरीही 'अनुवंशहीन' कविता दुर्बोध होईलच किंवा व्हावीच असे नाही. कारण त्या कवितेचे माध्यम मराठी भाषाच आहे. मग दुर्बोधता का यावी?

ग्रेस यांची कविता असो किंवा ती दुसरी कोणाचीही कविता असो तिच्यातील दुर्बोधता नव्या प्रतिमांमुळे, भाषेच्या नव्या जडणघडणीमुळे, नव्या जोडणीमुळे, व्यक्तिगत खाजगीपणामुळे, अनुभूतीच्या अपरिचित जाणीवांमुळे येऊ शकते. तरीही कवितेला समजून घेण्याचे मार्ग कवितेतच असतात. किंबहुना ते तसे कवितेतच असावेत. त्यासाठी कवीकडे अथवा कुणाकडेच जाण्याची गरज पडू नये.

कवितेत व्यक्तिगत खासगीपणा आल्याने दुर्बोधता येत असेल तर ते खासगीपण कवीला पुसता किंवा संपविता आले पाहिजे. हे खासगीपण Individuality जाऊन त्याला सामान्यपण Generical (comprehensive) देता आले पाहिजे. व्यक्तिगत पातळीवरील अनुभूतीची संवेदना अतिविस्तृत सामान्यपणाच्या पातळीवर नेता आली पाहिजे. कवितेचे खासगीपण जाऊन तिच्यात सामान्यपण आणता आले पाहिजे. ते करता आले नाही तर कविता दुर्बोध होते. कवी ग्रेस यांच्या बाबतीत नेमके हेच झाले पाहिजे.

कलावंताला आपल्या भावभावनांचे कौतुक करून भागत नाही. अनुभवात खोल बुडूनही त्यापासून अलिप्त राहण्याची, सामान्यांना खरी न वाटणारी, शक्य न होणारी किमया त्याच्याजवळ असावी लागते. ही किमया ग्रेसजवळ नाही त्यामुळे त्यांच्या कविता आत्मकेंद्री आणि व्यक्तिगत राहतात.

नवीन अनुभूती, नवीन संकेत, नव्या जाणिवा, नवी प्रतिमायोजना, नवी प्रतीके, अभिनव कल्पना इ. कवितेतून आविष्कृत करताना ग्रेस यांना भाषेची उणीव भासते. भाषाच त्यांच्या अभिव्यक्तीला अपुरी पडते म्हणून तर एके ठिकाणी ग्रेस म्हणतात.

भाषाच ही निकामी शब्दासही पुरेना
संवेदनाच द्यावी अर्थास काय पुन्हा?

ग्रेस यांना आपली भावानुभूती अभिव्यक्त आणि संक्रमित करण्यासाठी भाषा निकामी वाटते. इथे ग्रेसच्या कवितांना भाषेची क्षमता अपुरी वाटते आहे.

भाषेबद्दल कवी ग्रेस हळवे आणि संवेदनशील व जाणीवपूर्वक विचार करताना दिसतात. त्यांना भाषेबद्दल खूप आत्मियता आहे. पण ज्या भाषेत जे जन्माला आले त्या भाषेच्या मर्यादा त्यांना जाणवल्यानंतर ते भाषेविषयी दुःखाने पण तरीही आत्मियतेने तक्रार करतात,

"ज्या भाषेत मी जन्माला आलो तिथेही
अनाथ वाटते मला !"[२८]

ग्रेस यांच्या वरील विधानाचा सूक्ष्म विचार केला तर असे लक्षात येते की, त्यांना भाषा ही आई वाटते आणि ती आपली अनुभूती संक्रमित करण्यासाठी शब्दांचे, त्यांच्या अर्थाशयधारकतेचे आणि वाहकतेचे स्रोत पूर्णपणे कवीला देत नाही म्हणून कवीला अनाथ वाटते. आईचे पुरेसे प्रेम न मिळाल्याची तक्रार एखादे मूल करते तद्वतच ही ग्रेस यांची तक्रार वाटते. अशी भाषेविषयी तक्रार करणारे ग्रेस हे पहिलेच कवी असावेत. बा.सी.मर्ढेकरांना भाषेच्या अपुरेपणाची जाणीव झाली होती. हे जरी खरे असले तरी, भाषेच्या बाबतीत 'अनाथ'पणाची जाणीव व्यक्त करणारे ग्रेस हे मराठीतील पहिलेच कवी असावेत.

ग्रेस यांच्या कवितेतील दुर्बोधता ज्या कारणांनी येते ती तीन कारणे आहेत असे वाटते.

(१) कवितेतील व्यक्तिगत खासगीपण.

(२) भाषेचे त्यांना जाणवणारे अपुरेपण आणि भाषिक मांडणी.

(३) भासपातळीवर प्रतिभा पातळीवर आणि वास्तवाच्याव पातळीवरील होणारी अनुभवाची व्यामिश्रता, संमिश्रता आणि अद्‌भूतता.

ग्रेस हे आत्ममग्न, आत्मकेंद्री कवी आहेत. त्यांच्या कवितेचे स्वरूप आत्मचिंतनात्मक असले तरीही ते सार्वजनिक (Generalization या अर्थाने) सार्वकालिक व विस्तृत होत नाही त्यामुळे त्या काव्यस्वरूपाला कायमचे खाजगीपण आणि व्यक्तिगतता आली आहे म्हणून त्यांच्या कवितेत दुर्बोधता येते.

ग्रेस यांच्या वक्तव्यावरून त्यांना भाषा अपुरी, निकामी वाटते. त्यामुळे त्यांची अनुभूती व्यक्त करताना मर्यादा पडतात. असे त्यांचे म्हणणे आहे. नेमका अनुभव नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी भाषेचे माध्यम अपुरे ठरल्याने त्यांची कविता दुर्बोध होते.

ग्रेस नेहमीच प्रतिभा पातळीवर वावरतात. तसेच भास-आभासाच्या आणि स्वप्नांच्या विश्वातही ते जगतात पण त्याचबरोबर अपर्यायी वास्तव त्यांना अटळ आहे. प्रतिभानिर्मिती प्रतिमांचे विश्व, भास-आभासांचे आणि स्वप्नांचे प्रदेश आणि प्रखर अटळ वास्तव जग या तिहेरी पदरांच्या पेडातून येणारे अनुभूतीचे आविष्कार कवितेला दुर्बोध बनवतात. कारण या अनुभवांचे कार्यकारणभाव सांगता येत नाहीत आणि स्वप्नातील अद्‌भूतता आणि भास-आभासांचा स्पर्श काव्यानुभवाला वास्तवता देत नाही. आणि कविता जटिल आणि व्यामिश्रता देते. वाचकांना दुर्बोध वाटते.

ही तीन ठळक कारणे ग्रेस यांच्या कवितेला दुर्बोधतेची बेसरबिंदी घालते असे मला वाटते. या दुर्बोधतेच्या बेसरबिंदीबद्दल ग्रेस यांचे स्पष्टीकरण करून या प्रकरणाचा शेवट करणे योग्य वाटते.

"आणि माझ्या कवितेच्या नाकात तर, जन्मतःच कर्णाला जशी कवच-कुंडले शरीरासमवेत मिळाली होती, तशी दुर्बोधतेची बेसरबिंदी जन्मापासूनच टोचून आलेली आहे."

"खरे तर माझ्या कवितांच्या शब्दविसर्जनाच्या प्रदेशात ही दुर्बोधतेची बेसरबिंदी मी अनेक ठिकाणी दडवून ठेवली आहे. ती चोरीचा माल म्हणून नव्हे, तर रहस्यशरणाचे दैवी गुपित म्हणून !"[२९]

कवी ग्रेस जेव्हा त्यांच्या कवितेतील दुर्बोधतेबद्दलचे 'रहस्यशरणाचे दैवी गुपित' उघड करतील तेव्हाच त्यांच्या दुर्बोध कविता समजतील; कमीत कमी त्यांच्या कवितातील दुर्बोधतेचे कारण व रहस्य तरी उकलेल. हे ही नसे थोडके !

सारांश – या प्रकरणात आपण दुर्बोधता म्हणजे काय हे समजावून घेतले. मराठी कवितेत दुर्बोधतेची संकल्पना नेमकी केव्हा रूढ झाली, तत्पूर्वी मराठी कवितेत दुर्बोधता अस्तित्वात होती काय, असल्यास तिचे स्वरूप कसे होते याचाही उहापोह आपण काही उदाहरणांच्या आधारे थोडक्यात केला. मराठी कवितेतील दुर्बोधतेची कारणे शोधण्याचाही आपण प्रयत्न केला. दुर्बोधतेचे समर्थक आणि विरोधक अशा दोन्ही पक्षांची विचारधारा आपण अभ्यासली आणि ग्रेस यांच्या कवितेतील दुर्बोधतेचे स्वरूप पाहिले.

यापुढील प्रकरणात आपण ग्रेस यांच्या भाषाशैलीचा आणि प्रतिमासृष्टीचा स्वरूपशोध घेणार आहोत.

संदर्भसूची

१) गो.वि.करंदीकर : 'काव्यात्म दुर्बोधता पहिली, दुसरी आणि तिसरी' समाविष्ट ग्रंथ, 'काव्यातील दुर्बोधता' समीक्षा अंक २, पृष्ठ क्र.३,४.

२) श्री.के.क्षीरसागर : 'टीकाविवेक', पृष्ठ २५२,२५३.

३) दि.पु.चित्रे : 'काव्यात्म दुर्बोधता पहिली आणि अखेरची' समाविष्ट ग्रंथ, 'काव्यातील दुर्बोधता' समीक्षा अंक -२, पृष्ठ १३.

४) नरहर कुरूंदकर : 'काव्यविवेचनातील अडचणी' समाविष्ट ग्रंथ, 'काव्यातील दुर्बोधता' समीक्षा अंक -२, पृष्ठ १९.

५) नरहर कुरूंदकर : तत्रैव,पृष्ठ १९,२२.

६) रा.श्री.जोग : 'काव्यात्म दुर्बोधता' समाविष्ट ग्रंथ, 'काव्यातील दुर्बोधता' समीक्षा अंक २, पृष्ठ २८.

७) विजया राजाध्यक्ष : 'मर्ढेकरांची कविता : स्वरूप आणि संदर्भ' खंड १ला पृष्ठ १७७.

८) सुधीर रसाळ : 'काव्यातील दुर्बोधता' समाविष्ट ग्रंथ, 'काव्यातील दुर्बोधता' समीक्षा अंक २, पृष्ठ ४१

९) सुधीर रसाळ : तत्रैव, पृष्ठ ४३.

१०) गंगाधर गाडगीळ : 'खडक आणि पाणी' पॉप्युलर बुक डेपो मुंबई प्रथम मुद्रण डिसें १९६०, पृष्ठ ११२,११३.

११) रा.श्री.जोग : 'मराठी कविता १९४५ ते १९६५', प्रकाशक बापुराव नाईक मराठी साहित्यसंघ मुंबई प्रथम आवृत्ती आक्टो.१९६७ पृष्ठ ३५,३६.

१२) दि.के.बेडेकर : 'आधुनिक मराठी काव्य उद्गम, विकास आणि भवितव्य', प्रकाशक - आर.जी.देसाई लोक वाङ्मय गृह प्रा.लि.मुंबई आवृत्ती - २ सप्टें.१९७८ पृष्ठ ४५

१३) श्री.के.क्षीरसागर : 'टीकाविवेक', प्रकाशक ग.रा.भटकळ पॉप्युलर प्रकाशन मुंबई ३४. आवृत्ती १ ली सप्टें.१९६५ पृष्ठ २५२-२५३.

१४) श्री.के.क्षीरसागर : तत्रैव पृष्ठ २५४.

१५) दि.के.बेडेकर : 'आधुनिक मराठी काव्य उद्गम विकास आणि भवितव्य', प्रकाशक आर.जी.देसाई लोकवाङ्मय गृह प्रा.लि.मुंबई आवृत्ती - २ सप्टें.१९७८ पृष्ठ ४५

१६) रा.श्री.जोग : 'चर्वणा' प्रकाशक अ.अ.कुलकर्णी कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे २ प्रथम आवृत्ती मे १९६०, पृष्ठ ८४.

१७) गो.वि.करंदीकर : 'काव्यात्म दुर्बोधता पहिली, दुसरी आणि तिसरी' समाविष्ट ग्रंथ, 'काव्यातील दुबोधता' समीक्षा अंक २, पृष्ठ ७.

१८) द.भि.कुलकर्णी : 'पहिली परंपरा' पृष्ठ ४८,४९.

१९) विजया राजाध्यक्ष : 'मर्ढेकरांची कविता स्वरूप आणि संदर्भ' खंड पहिला. पृष्ठ १७७,१७८.

२०) रा.श्री.जोग : 'मराठी कविता १९४५-१९६५' पृष्ठ १३

२१) रा.श्री.जोग : 'विचक्षणा' पृष्ठ १२०.

२२) विजया राजाध्यक्ष : 'मर्ढेकरांची कविता : स्वरूप आणि संदर्भ' खंड पहिला. पृष्ठ १७८.

२३) गंगाधर गाडगीळ : 'खडक आणि पाणी' पृष्ठ १००,१०४,११२.

२४) जयंत परांजपे : 'ग्रेस आणि दुर्बोधता' पृष्ठ १७.

२५) जयंत परांजपे : 'ग्रेस आणि दुर्बोधता' प्रास्ताविक, पृष्ठ ९.

२६) ग्रेस : ग्रेस : मुलाखत. 'एकांत आणि एकाकीपणा हा माझ्या निर्मितीप्रक्रियेचा स्वभाव' डॉ.अक्षयकुमार काळे यांनी ग्रेस यांची घेतलेली मुलाखत : ग्रंथमाला,पृष्ठ १०६, १०७, १०८.

२७) ग्रेस : 'ग्रेस : एक वाङ्मयीन सहजसंवाद' प्रा.चं.वि.जोशी यांनी घेतलेली ग्रेस यांची मुलाखत. 'त्रैमासिक अनुबंध' एप्रिल ,मे,जून १९९९, पृष्ठ २८.

२८) ग्रेस : 'संध्यामग्न पुरूषाची लक्षणे' पृष्ठ - ९१.

२९) ग्रेस : 'मितवा' पृष्ठ - १९६,१९८.

****